# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०८ मार्च, २०२२ / फाल्गुन १७, १९४३ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(३)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(४)** | **नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

---

## मुंबईतील कुर्ला (पश्चिम) येथील प्रिमिअर कंपनीच्या जागेवर कोहिनूर सिटी प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

**(१) * ३९९२८ श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला (पश्चिम) येथील प्रिमिअर कंपनीच्या जागेवर कोहिनूर सिटीच्या झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण अंतर्गत मे.दिवाण विकासक यांच्या एच.डी.आय.एल. या कंपनीकडून प्रकल्प राबविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील, मिठी नदीच्या पात्रातील बाधित तसेच मिठी नदी शेजारील क्रांतीनगर, संदेशनगर, जरीमरी व बामणडायापाडा येथील झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे बंधनकारक

असतांना तत्कालिन विकासक दिवाण यांनी इमारतीचा विकास करुन विक्रीसाठी असलेल्या इमारती बांधून विक्रीसुध्दा केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच विकासकाने सदर जागेवर बांधकाम करतांना शासनाच्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमांचे उल्लंघन करुन सदर इमारतीचे बांधकाम केलेले असून, शासनाचा सुमारे ६० कोटी रुपयांचा महसूल थकीत ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर इमारतीमध्ये नागरी सुविधांसाठी ५ टक्के सुविधा भूखंड राखीव ठेवणे बंधनकारक असतांना त्यास बगल देत विकासकाने शासकिय अधिकारी यांच्या संगनमताने सदर प्रकल्पात मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पाची सखोल चौकशी व्हावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित प्रकरणातील दोषी आढळून आलेल्या विकासक व अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे नाही.

प्रिमीअर कंपनीच्या जागेवर कोहिनूर सिटी प्रकल्पास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून कोणतीही मंजुरी देण्यात आलेली नाही.

तथापि, कोहिनूर सिटी लगत असलेल्या प्रिमीअर कंपनीच्या न.भू.क्र.६३७, ६३७/४४ ते ४६ पार्ट, ६३७/४९ पार्ट, ६३७/५३, ६३७/५४ ते ५६ पार्ट, ६३७/५५८, ६३७/५९ ते ७७ पार्ट, ६३७/७८ आणि ६३७/८७ ते १२१ गाव कुर्ला-२ या जागेवर विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील कलम ३३(१०) अंतर्गत परि-०४ मधील उपकलम ३.११ अंतर्गत भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील अतिक्रमीत झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी मे.एच.डी.आय.एल. या विकासकाकडून योजना राबविण्यात येणार होती.

(२) सदर प्रकल्पास विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील कलम ३३ (१०) अंतर्गत परि-०४ मधील उपकलम ३.११ अंतर्गत भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील अतिक्रमीत झोपडीधारकांसाठी मे.एच.डी.आय.एल.या विकासकाकडून पुनर्वसन योजना राबविण्यास मान्यता दिली होती.सदर जागेवर २५% विक्री योग्य घटक बांधकामास शासनाने परवानगी दिलेली आहे. त्यानुषंगाने विकासकाने विक्री घटक घरांचे बांधकाम करुन त्यांची विक्री केलेली आहे.

(३) विकासकाने सदर जागेवर मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केलेले आहे. तसेच या अभिन्यासातील इमारत क्र.०५ व ०६ मधील १३३६ सदनिका ह्या संक्रमण शिबीर म्हणून एच.डी.आय.एल. विकासकाच्या वापरात असल्यामुळे त्याचे थकीत भाडे रु.६९.९३ कोटी भरणा करणे प्रलंबित आहे.

(४) कुर्ला प्रिमिअर कंपनीच्या जागेवर एच.डी.आय.एल विकासकाकडून १०% राखीव असलेल्या सुविधा भूखंडावर रुग्णालय व नर्सींग ट्रेनिंग सेंटर इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आलेले होते. तथापि, आर्थिक अडचणीमुळे सदर बांधकाम अर्धवट स्वरुपात करण्यात आलेले आहेत.

(५) व (६) सदर प्रकल्पाच्या चौकशीबाबत लोकप्रतिनिधींकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पत्रव्यवहार झालेला आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (CSMIA) अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण निमयावलीमधील फेरबदलाच्या मंजुरीचे कलम ३७(१कक) (ग) खालील नगर विकास विभागाची अधिसूचना दि.२९ जून, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. त्यान्वये छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (CSMIA) अधिसुचित क्षेत्रातील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने मा.महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने विमानपत्तन प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या सद्य:स्थितीसह, या योजनेचे दस्तऐवज व संपूर्ण अभिलेख हे मुंबई महानगर विकास प्राधिकरणास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पत्र क्र.२५४९१/एल., दि.१३.०७.२०२१ अन्वये हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. पुढील कार्यवाही मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून करण्यात येईल.

-----------------

## गारगांव व परळी (ता.वाडा, जि.पालघर) विभागातील विविध विकास कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२) * ४०९१७ श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगांव व परळी (ता.वाडा, जि.पालघर) विभागातील विविध रस्त्यांच्या विकास कामांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विकास कामे न करताच सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागामध्ये गावांची व पाड्यांची नावे बदलून तीच कामे झाल्याचे दाखवून बनावट देयके काढून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या गैरव्यवहाराबाबत आदिवासी विकास संघर्ष समिती व शिवक्रांती संघटनेचे कार्यकर्ते यांनी बेमुदत उपोषण व धरणे आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित गैरव्यवहार केलेल्या दोषीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

गारगांव व परळी येथील विविध विकास कामांमधील गैरव्यवहाराबाबत आदिवासी विकास संघर्ष समिती व शिवक्रांती संघटनेचे कार्यकर्ते यांनी दि. १०/०१/२०२२ रोजी उपोषण सुरु केले होते. सदर उपोषण दि.१२/०१/२०२२ रोजी मागे घेण्यात आले आहे.

(४) सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रायगड, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली आहे. चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील पाचपावली उड्डाणपूलाची झालेली दूरवस्था

**(३) * ३९४३६ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील उत्तर व पूर्व नागपूरला जोडणाऱ्या पाचपावली उड्डाणपूलाची दूरवस्था झाली असून कमाल चौक ते गोळीबार चौकापर्यंत लांब असलेल्या या पुलाच्या गर्डरची जोडणी उखडल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उड्डाणपूलाची आयुमर्यादा संपली असल्याने येथील नागरीकांनी संबंधित विभागाकडे वारंवार नवीन पूल बांधण्याची मागणी केली असून, याकडे संबंधित विभाग दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पाचपावली उड्डाणपूलाची नव्याने पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) नागपूर महानगरपालिकेने कळविल्याप्रमाणे हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) NHAI नागपूर यांनी त्यांचे दि.१९.०८.२०२१ च्या पत्रान्वये इंदोरा चौक ते पाचपावली व अग्रसेन चौक ते अशोका चौक ते शितलामाता मंदिर या आखणीत उड्डाणपुल बांधणेबाबतचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) केंद्र शासनास सादर केला आहे. मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही NHAI मार्फत करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाचा अनुशेष भरण्याबाबत

**(४) * ४१६५५ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय नोकऱ्यांमध्ये इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाचा दोन लाखांहून अधिक पदांचा अनुशेष आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रवर्गाला शिक्षण, नोकऱ्यांमध्ये पूर्ण आरक्षण माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत देण्याचे शासनाने जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रवर्गातील नोकऱ्यांमधील अनुशेष भरण्यासाठी शासकीय नोकरी व शिक्षणात आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) दिनांक ३१.०८.२०२० अखेरपर्यंत शासन स्तरावर उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार राज्यात शासकीय नोकऱ्यांमध्ये सरळसेवेच्या कोटयात ओबीसी, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाचा मिळून १५४२६ इतका अनुशेष असल्याचे दिसते.

(२) शासकिय नोकरभरतीमध्ये सरळसेवेकरिता लागू करण्यात आलेल्या आरक्षणाच्या धर्तीवर सद्यस्थितीत शैक्षणिक संस्था/शाळा/ विद्यापीठे/ महाविद्यालये तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक प्रवेशाकरिता विजाअ ३%, भज ब-२.५%, भज क-३.५%, भज ड-२%, इमाव-१९% याप्रमाणे आरक्षण ठेवण्यात आले आहे.

(३) राज्य शासकिय नोकऱ्यांमध्ये ओबीसी, भटक्या विमुक्त जाती/जमाती व अन्य मागासप्रवर्गाचा रिक्त पदांचा अनुशेष भरण्यासाठी विशेष भरती मोहिम राबविण्याच्या अनुषंगाने सर्व प्रशासकिय विभागांकडून दिनांक १४.०२.२०२२ च्या पत्रान्वये व दिनांक २२.०२.२०२२ च्या स्मरणपत्रान्वये दिनांक ३१.१२.२०२१ अखेरच्या अनुशेषांच्या पदांची माहिती मागविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेच्या आरक्षित भूखंडावर भूमाफियांनी अनधिकृत इमारती व चाळी उभारल्याबाबत

**(५) * ३८६३३ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेच्या आरक्षित भूखंडावर अनधिकृत उंच इमारती आणि चाळी उभारुन भूमाफियांनी विकास प्रकल्पाच्या जागा गिळंकृत केल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आल्यानंतर, तत्संदर्भात माजी नगरसेवक श्री.वामन म्हात्रे यांनी आयुक्त कल्याण-डोंबिवली महापालिका यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीनुषंगाने तसेच भूमाफियांनी आरक्षित भूखंडावर बेकायदेशीर उंच इमारती आणि चाळी उभारल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कायदेशीर कारवाई तसेच अनधिकृत बांधकामे विनाविलंब निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची तक्रार श्री. वामन म्हात्रे, माजी नगरसेवक यांनी दि.२४.१२.२०२० रोजी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे केली, हे खरे आहे.

(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द विहीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार (S.O.P.) निरंतर कार्यवाही करण्यात येते.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्रात “प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी” अनधिकृत बांधकामाविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० व २६७ (१) अन्वये नोटीस काढून बांधकाम धारकास “अधिकृतता” दर्शविणारे कागदपत्र सादर करणेबाबत सुनावणी आयोजित करतात.

सदरचे बाधंकाम अनधिकृत असल्यास बांधकाम धारकास स्वखर्चाने सदर बांधकाम काढून टाकण्याची सूचना दिली जाते.

सदरचे बांधकाम बांधकामधारकाने मुदतीत काढून न घेतल्यास संबंधित प्रभागामार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते.

सन २०१५ ते ३१ डिसेंबर, २०२१ अखेरपर्यंत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत ११४४२ अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत तर ४५५ अनधिकृत बांधकामधारकांविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडावर अनधिकृत उंच इमारती व चाळी उभारून भूमाफियांनी विकास प्रकल्पाच्या जागा गिळंकृत केल्या, ही बाब वस्तुस्थितीस धरून नसल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वर्सोवा अंधेरी (पश्चिम) येथे मोठया प्रमाणात कांदळवनाची तोड होत असल्याबाबत

**(६) * ३८७३४ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वर्सोवा अंधेरी (पश्चिम) येथे मोठया प्रमाणात कांदळवनाची तोड होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑफ यारी रोड, पार्क प्लाझा फिशरीज युनिव्हर्सिटीच्या मागील बाजूस तसेच मुंबई महानगरपालिकेच्या पेट पार्कच्या मागील बाजूस मोठया प्रमाणात कांदळवनाची तोड होत असून सदर जागांवर अनधिकृत झोपडया बांधण्याचे तसेच सदर झोपडया या ४ ते ५ लाखांना विकण्यात येत असून त्याद्वारे खरेदी-विक्रीचे व्यवहार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रार करुन देखील प्रशासनाने दखल घेतली नाही, हे ही खरे काय
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कांदळवनांची तोड करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) व (२) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दि.०६/१०/२०२० रोजी उद्देशून लिहिलेल्या पत्रात ऑफ यारी रोड, पार्क प्लाझा फिशरीज युनिव्हर्सिटीच्या मागील बाजूस तसेच मुंबई महानगरपालिकेच्या पेट पार्कच्या मागील बाजूस मोठया प्रमाणात कांदळवनाची कत्तल होत असून सदर जागांवर अनधिकृत झोपड्या बांधण्यात येत असून खरेदी-विक्रीचे व्यवहार होत आहेत, असा उल्लेख पत्रात केला आहे. तथापि मुंबईतील वर्सोवा अंधेरी (पश्चिम) येथे मोठया प्रमाणात कांदळवनाची तोड होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही.
(३), (४) व (५) वर्सोवा येथील कांदळवनाचे क्षेत्र कांदळवन विभागाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर मौजे वर्सोवा येथील राखीव वन न.भू.क्र.३/१/१(पै) वर आढळून आलेल्या ५१ अनधिकृत झोपड्यांबाबत चौकशी करण्यात आली असून संबंधित अतिक्रमणधारकांविरुध्द वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांच्या कार्यालयामार्फत तपासणी करुन वनगुन्हा क्रमांक ई-५/२०२२ दि.१५/०२/२०२२ नोंदविण्यात आला आहे. सहायक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई तथा प्राधिकृत अधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम ५३, ५४ अन्वये ५१ अतिक्रमणधारकांना नोटीस दिलेल्या असून पुढील चौकशी सुरु आहे.

-----------------

## पालघर व ठाणे या जिल्हयाला जोडणाऱ्या भिवंडी-वाडा-मनोर या राज्यमहामार्गाची झालेली दुरवस्था

**(७) * ३९७४० श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर व ठाणे जिल्हयाला जोडणारा भिवंडी-वाडा-मनोर हा ६४ किमीचा राज्य महामार्ग सुमारे ३५० कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आला असून, सदरहू रस्ता अपुर्णावस्थेत असून मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने तसेच नादुरुस्त झाल्यामुळे तेथे वांरवार अपघात होऊन जिवीत व वित्तहानी झाल्याने संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांविरोधात श्रमजीवी संघटनेने दिनांक १९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी-वाडा-मनोर महामार्गावरील रस्त्याच्या दुरवस्थेबाबत संबंधित अधिकारी व ठेकेदारांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची मागणी ‘समर्थन’ संस्थेने दिनांक २३ जुलै, २०१९ व दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते) व जिल्हाधिकारी (पालघर) यांच्याकडे लेखी निवदेनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक ९ जानेवारी, २०२२ रोजी वाडा येथे व्यापक जनआंदोलन होऊन प्रचंड जनक्षोभ निर्माण झाला असून, सदर ठिकाणी श्री.सपकाळ, कार्यकारी अभियंता, पालघर यांना बोलाविण्यात आले असता, त्यांनी भेट नाकारणे, उडवाउडवीची उत्तरे देणे व कार्यालयात अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी-वाडा-मनोर महामार्गावरील वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व अपघात टाळण्यासाठी शासनाने निधी मंजूर करून रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत तसेच रस्त्याच्या दुरवस्थेस जबाबदार असणाऱ्या कंपनी व ठेकेदाराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण** : (१) होय, आंदोलन केले हे खरे आहे.

(२) होय, निवेदन प्राप्त आहे.

(३) कार्यकारी अभियंता यांच्या खुलाशात असे वर्तन करण्यात आलेले नाही, हे नमूद केले आहे.

(४) दिनांक ११.१०.२०१९ रोजी शासनाने संबधीत उद्योजकाकडून होणारी पथकर वसूली रद्द केली असून सद्यस्थितीत सा.बां.विभागामार्फत देखभाल व दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ (जि.यवतमाळ) गृहनिर्माण व क्षेत्रविकास म्हाडा अंतर्गत मध्यम उत्पन्न गटाच्या घरांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे व अपुर्णावस्थेत असल्याबाबत**

**(८) * ४१३५१ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) गृहनिर्माण क्षेत्रविकास म्हाडा अंतर्गत सन २०१२ मध्ये जाहीरातीनुसार बाजोरीया नगर येथे २८ गाळे मध्यम उत्पन्न गटासाठी तसेच प्रस्तावीत २८ बैठी जोडघरे बांधण्याची योजना अंमलात आली असुन १० वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा अर्जदारांना घरे वाटप करण्यात आली नसून, सदरहू घराचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक २० जानेवारी २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जाहीरातीमध्ये बैठी जोडघराचा उल्लेख करण्यात आला असून, सर्व ग्राहकांकडून त्याप्रमाणे रक्कम वसूल केली मात्र बांधकाम चाळींसारखे केले असून पाण्याची टाकी लावण्यात आली नाही तसेच पाईपलाईन अपुर्णावस्थेत असून, गटाराचे आउटलेट काढलेले नसून विद्युत जोडणीचे काम प्रलंबित असून घराच्या भिंतीनाही भेगा पडल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी १० वर्षाचा कालावधी होउन म्हाडाकडे आजही भोगवटा प्रमाणपत्र नाही तसेच नकाशा मंजूर करण्यात आलेला नसल्यामुळे यवतमाळ नगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्राचा प्रस्ताव खारीज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) व (२) अंशत खरे आहे.

सन २०११ मध्ये बाजोरिया नगर, यवतमाळ येथे २८ गाळे मध्यम उत्पन्न गट ही योजना प्रस्तावित करण्यात आली. दि.०७/०३/२०१२ अन्वये भूखंड विभाजनाच्या सुधारीत अभिन्यासास मंजूरी प्राप्त झाली. त्याअनुषंगाने ऑगस्ट, २०१२ मध्ये सदरहू कामाचा कार्यादेश देण्यात आला असून सदर योजना जून २०१९ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला आहे.

-----------------

## मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील दामूनगर खदानीमध्ये अनधिकृत मोबाईल टॉवर उभारल्याबाबत

**(९) * ३८४९८ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील दामूनगर खदानीमध्ये अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत मोबाईल टॉवरमधून येणाऱ्या रेडिएशनमुळे विविध आजार होण्याचा धोका असल्यामुळे, मोबाईल टॉवरबाबतची तक्रार स्थानिकांनी महानगरपालिकेच्या आर-दक्षिण विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी कारवाई करण्यास पालिकेकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी दिनांक ११ जानेवारी, २०११ रोजी वा त्यासुमारास केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने या अनधिकृत मोबाईल टॉवरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१) हे खरे आहे.
(२) सदर अनधिकृत मोबाईल टॉवर संदर्भात दिनांक १२.११.२०२१ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रार प्राप्त झाली होती हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर ठिकाणी जुने कुठलेही अनधिकृत मोबाईल टॉवर अस्तित्वात नसून, नवीन मोबाईल टॉवरचे बांधकाम सुरु असल्याबाबतची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होताच सदर मोबाईल टॉवरचे बांधकाम बंद करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४-अ अन्वये दिनांक २७.१०.२०२१ रोजी स्टॉप वर्क नोटीस देण्यात आली आहे.

तथापि सदर नोटीशीस पक्षकाराने मा. नगर दिवाणी न्यायालय, दिंडोशी येथे दावा क्र.२३१४/२०२१ अन्वये आव्हान दिले असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदर मोबाईल टॉवरवर निष्कासनाची कारवाई करण्यात येणार आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदगांव (ता.सुधागड, जि.रायगड) येथील सरस्वती नदीवरील वाहतुकीस धोकादायक असलेल्या पुलाबाबत

**(१०) * ३९००२ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (ता.सुधागड, जि.रायगड) येथील पाली-रवाळजे मार्ग हा मुंबई-गोवा मार्गाला जोडणारा अत्यंत महत्वाच्या मार्गावरील सरस्वती नदीवर दोन्ही बाजूला संरक्षण कठडे नसणारा पूल जीर्ण होवून अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबतचे निवेदन स्थानिक नागरिकांनी शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त पुलाच्या बाजूला नवनिर्मित पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) सदरचा पूल वाहतुकीसाठी धोकादायक नाही.

(२ निवेदन प्राप्त नाही.

(३) होय, पाहणी केली आहे.

(४) हायब्रीड ॲन्युईटी अतंर्गत प्रगतीपथावरील कामात प्रश्नांकीत पुलाचे पूनर्बांधणीचे काम अंतर्भूत आहे. सदर प्रकल्प जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बावळेगाव (ता.महाड, जि.रायगड) येथील दोन्ही पुल कोसळल्याने रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(११) * ३९८८४ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावळे गाव (ता.महाड, जि.रायगड) हे धरण क्षेत्रात येत असून येथील दोन्ही पुल कोसळलेले आहेत. तसेच रस्त्यांचीही अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही पुल व रस्ते तातडीने दुरुस्त करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पुल व रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) बावळे गावाजवळील वारंगी पर्यतच रस्ता अस्तित्वात असून त्यापुढील भाग धरणाच्या बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे तेथे रस्ता व पूल अस्तित्वात नाही.

(२) सद्य:स्थितीत अशी मागणी प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध विभागांतील रिक्त पदांबाबत

**(१२) * ४०२१८ श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध विभागात हजारो पदे रिक्त असतानाही शासनामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगकडे केवळ ७ हजार ४६० पदांची मागणी पत्रे देण्यात आल्याने लाखो सुशिक्षित बेरोजगार शासकीय नोकरीपासून वंचित राहत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विविध विभागातून दर महिन्याला हजारो कर्मचारी सेवानिवृत्त होत असतानाही ही पदे तात्काळ भरली जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कृती आराखडा तयार केला आहे काय व त्याअनुषंगाने १०० टक्के रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उद्धव ठाकरे :** (१) दि.३१ डिसेंबर, २०२१ अखेर शासनाच्या संबंधित विभागांकडून एकूण ७९६१ पदांची मागणी पत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगास प्राप्त झाली आहेत.

(२) व (३) राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सेवानिवृत्ती तसेच इतर कारणांनी पदे रिक्त होतात. रिक्त पदे ही नामनिर्देशन, पदोन्नती व प्रतिनियुक्तीव्दारे भरण्यात येतात. रिक्त पद भरती प्रक्रीया राबविण्याची प्रक्रीया ही निरंतर चालणारी प्रक्रीया आहे.

ज्या विभागांचा आकृतिबंध निश्चित / अंतिम करण्यात आला आहे, त्या विभागांना वित्त विभागाच्या दि. २५.५.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदींच्या अधीन राहून रिक्त पदे भरण्यास अनुमती आहे. तथापि रिक्त पदे भरण्याची तातडी व आवश्यकतेनुसार वित्त विभागाने गठीत केलेल्या उप समितीच्या मान्यतेने रिक्त पदे भरण्याची तरतूद आहे. त्याच प्रमाणे वित्त विभागाच्या दि.३०.०७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के रिक्त पदे भरता यावीत अशा पदांना निर्बंधांमधून सुट देण्यात आली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील हंसा हेरीटेज इमारतीला लागलेल्या आगीची चौकशी करण्याबाबत

**(१३) * ३८३८८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील मथुरादास मार्गावरील हंसा हेरीटेज इमारतीमधील चौदा मजल्यावरील फ्लॅट क्र.१४०१ ला आग लागून त्यामध्ये दोन ज्येष्ठ महिला नागरीकांचा आगीत होरपळून मृत्यु झाल्याची घटना दिनांक ७ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या तपासात विकासकाने पर्यायी वीज पुरवठा सबस्टेशन, स्टँण्डबाय पंप स्थापन करणे तसेच मंजूर आराखड्यानुसार पुर्वेकडील आपातकालीन दरवाजाचे प्रत्यक्षात बांधकाम न केल्याचे तसेच बांधकाम अपूर्ण असतानाही बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र बेकायदेशीररित्या पालिकेकडून मिळविल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोन ज्येष्ठ महिलांच्या मृत्युस कारणीभूत ठरलेल्या रघुवंशी कन्ट्रक्शन कंपनीच्या विकासकाविरुद्ध व संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील मथुरादास मार्गावरील हंसा हेरीटेज इमारतीला दिनांक ०६.११.२०२१ रोजी २०.३३ वाजता आग लागून त्यामध्ये दोन जेष्ठ महिलांचा मृत्यु झाला ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने दिनांक ०७.०४.२०१४ रोजी दिलेल्या “ना-हरकत” प्रमाणपत्रातील अटीनुसार स्वतंत्र वीज पुरवठा सबस्टेशन व स्टॅण्डबाय पंप बसविणे ही बाब इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करण्यापूर्वी करणे गरजेचे होते.

तसेच, सदर इमारतीस पूर्णत्वाचे प्रमाणपत्र (Building Completion Certificate) देण्यात आलेले नसून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन विभागाने दिनांक ०७.०४.२०१४ रोजी दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रानुसार व ना-मंजुरीच्या सूचनेतील (आय.ओ.डी.) इतर सर्व अटींची पूर्तता झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(४) व (५) सदर आगीच्या दुर्घटनेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

- बृहन्मुबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०७.११.२०२१ व ०८.११.२०२१ रोजी इमारतीची पाहणी करण्यात आली.
- अग्निशमन विभागाने दिनांक ०२.११.२०१२ रोजी दिलेल्या 'ना हरकत प्रमाणपत्रातील' अटी व शर्तीची पुर्तता न झाल्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या तरतुदीनुसार, संबंधित विकासक व मालक / भोगवटादार यांना दिनांक ०७.११.२०२१, १३.११.२०२१ व १०.०१.२०२२ रोजी नोटीस देण्यात आल्या आहेत.
- इमारतीच्या पुर्वेकडील गेटचे बांधकाम न केल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हंसा हेरीटेज इमारतीचे अध्यक्ष / सचिव यांना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये दिनांक १४.१२.२०२१ रोजी नोटीस देण्यात आली आहे.
- बृहन्मुंबई पोलिसांमार्फत कांदिवली पोलिस ठाणे येथे अपघात मृत्यु अहवाल (ए.डी.आर.) क्रमांक ११५/२१ व ११६/२१ दाखल करण्यात आला आहे.
- कांदिवली पोलिस ठाणे यांच्यामार्फत इमारतीचे विकासक, सेक्रेटरी, चेअरमन आणि आर्किटेक्ट यांचे विरुध्द दिनांक २०.११.२०२१ रोजी प्रथम खबरी अहवाल (FIR) क्र. ९२८/२०२१ दाखल केला आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील रस्ते दुरुस्तीच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत

**(१४) * ४०३५४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील राज्य मार्ग क्रमांक २७८ वरील कि.मी. ३४/०० ते ७९/०० मधील लांबीच्या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजी सार्वजनिक बांधकाम अधीक्षक अभियंता यांनी संबंधित सहायक अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी अवाजवी तरतुदीची मागणी, दिशाभूल करण्याचा प्रयत्न तसेच शासनाची मोठी हानी अशा गंभीर स्वरूपाचा ठपका कारणे दाखवा नोटीसमध्ये केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अकोला जिल्ह्यातील राज्य महामार्ग क्रमांक २७४ वरील कि.मी. ९७/०० ते १०७/०० रस्त्याच्या कामाची सुधारणा करण्याकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला यांनी दिनांक ५/१२/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश दिले असून, उक्त काम पूर्ण करण्याचा विहित कालावधी ६ (सहा) महिने असून ३ (तीन) वर्षे उलटून सुद्धा संबंधित कंत्राटदाराने अद्यापही काम पूर्ण केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त काम पुर्ण करण्यास संबंधित कंत्राटदाराने अमसर्थता दर्शविली असल्याने, सदर कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्यासाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांनी शासनास सादर केले होते, ही ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करुन संबंधित अभियंत्यास निलंबीत करण्याबाबत तसेच सदरहू काम पुर्णत्वास नेऊन संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) सदर कामाच्या नियतकालीन देखभाल व दुरुस्ती बाबत संबधितास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे, हे खरे आहे.

(३) सदर रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झाले नाही, हे खरे आहे. कंत्राटदारावर करारनाम्यातील तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सदर कामाबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, अमरावती यांचेमार्फत चौकशी आदेशित करण्यात आली असून चौकशी अहवालातील प्राप्त निष्कर्षानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर दोन्ही रस्त्यांच्या कामाबाबत कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता वाहतुकीकरीता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

-----------------

## नागपूर शहरात मे.ऑरेन्ज सिटी वॉटर प्रा.लि. कंपनीने कंत्राट करारामध्ये अनियमितता केल्याबाबत

**(१५) * ३७८८५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये २४ X ७ अंतर्गत पाणी पुरवठा करण्याचे मे.ऑरेन्ज सिटी वॉटर प्रा.लि. या कंपनीला दिनांक १ एप्रिल, २०१२ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीमध्ये दिलेल्या रू.३८७.०० कोटीं रुपयांच्या पाणी पुरवठा योजना कंत्राटातील करारानुसार पूर्ण केली नसल्याने योजनेची किंमत रु.५२.०० कोटीने वाढली असुन निर्धारीत कालावधीमध्ये योजना पूर्ण केली नसल्याने महानगरपालिकेमार्फत रु.४१.०० कोटीं रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने माहे नोव्हेंबर, २०१९ ते जून, २०२० या कालावधीमध्ये वन-टाईम-सेटलमेंट अंतर्गत दंडाची रक्कम माफ करून योजनेची वाढीव रक्कम व दंडाची माफ केलेली अशी एकुण ९३.०० कोटीची रक्कम मे.ऑरेन्ज सिटी वॉटर प्रा.लि. कंपनीला परत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेतील वाढीव किंमत देतांना सुधारीत करारनामा करण्यात आला होता काय,

(४) असल्यास, निर्धारीत कालावधीमध्ये योजना पूर्ण न झाल्याने योजनेची वाढलेली किंमत, माफ करण्यात आलेली दंडाची रक्कम तसेच वन-टाईम-सेटलमेंटमुळे महानगरपालिकेचे होत असलेल्या रु.३७४.०० कोटीच्या रकमेला जबाबदार कोण आहेत,

(५) असल्यास, सदरहू जबाबदार असणाऱ्याची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेद्वारे केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा प्रणालीचे उन्नती करणे व बळकटीकरण करण्याकरिता खाजगी सहभागाच्या तत्वावर रू.३८७.६६ कोटी रक्कमेचा प्रकल्प हाती घेण्यात आला. सदर प्रकल्प राबविण्याकरिता व २५ वर्ष देखभाल दुरुस्तीसाठी ऑपरेटर म्हणून मे.ऑरेन्ज सिटी वॉटर प्रा.लि.यांची दि.०१.०३.२०१२ पासून नियुक्ती करण्यात आली. यामध्ये त्यांचा वाटा ३० टक्के इतका होता.यामध्ये ऑपरेटर यांनी ५ वर्षांमध्ये सदर प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, सदर काम विहित कालावधीत पूर्ण न झाल्याने भाव वाढीच्या फरकानुसार प्रकल्पाच्या किंमतीत रू.५३.८९ कोटी इतकी वाढ झाली आहे. ऑपरेटर यांच्याकडून कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार Foreign Expats ची नियुक्ती केली नसल्याने रू.३८.९० कोटी इतकी रक्कम रोखण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिका महासभेच्या ठराव क्र.३७० अन्वये दि.०५.०२.२०१९ अन्वये वन- टॉईम-सेटलमेंट मंजूर करण्यात आले. यानुसार ऑपरेटर यांना रू.९२.७९ कोटी रक्कम १२ महिन्यात व ६ हप्त्यात अदा करण्यास मान्यता देण्यात आली असून यापैकी यांना रू.७१.९० कोटी इतक्या रक्कमेचे प्रदान करण्यात आले आहे.

(३) या प्रकल्पाअंतर्गत Initial Performance Improvement Project (I.P.I.P.), Renewal and Replacement (R & R) ही कामे करण्यात तसेच कंत्राटातील अटी (Contractual Obligation) नुसार तांत्रिक व व्यावसायीक क्षमता (Technical and Commercial Efficiency) पूर्ण करण्याकरिता पुढील ५ वर्ष मुदतवाढ देण्याबाबत सुधारित करारनामा करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(४) नागपूर महानगरपालिका महासभेच्या ठराव क्र.३७० अन्वये दि.०५.०२.२०१९ अन्वये वन-टॉईम-सेटलमेंट मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्हयातून जाणाऱ्या सागरी महामार्गाच्या प्रारूप आराखड्यास केंद्र शासनाची मंजुरी मिळणेबाबत

**(१६) * ३८०२० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्हयातून जाणा-या सुमारे ५७० कि.मी. लांबीच्या सागरी महामार्गाचे पेव्हड शोल्डरसह उन्नतीकरण करण्याकरिता प्रत्यक्ष तसेच ड्रोन कॅमेऱ्याद्वारे सर्वेक्षण करण्यात येवून या कामाचा प्रारूप आराखडा माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रारूप आराखड्याला केंद्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे काय, असल्यास या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, राज्य शासनाकडून मंजुरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रारुप आराखडयास अद्यापपावेतो केंद्र शासनाकडून मंजूरी प्राप्त झालेली नाही.
(३) मंजूरी बाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रस्ते बांधणीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१७) * ३८२६६ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील रस्ता बांधणीच्या गैरव्यवहाराप्रकरणी दोषी असलेल्या व काळया यादीतील कंत्राटदारांना देण्यात आलेली ७ वर्षांची शिक्षा ३ वर्षे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काळया यादीतील कंत्राटदारांना पुन्हा मुंबईतील नवीन रस्ते बांधणीचे सुमारे रु.२२०० कोटींच्या निविदा प्रक्रियेत सहभागी करण्यात येत असून या नवीन रस्त्याच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाकडून अद्यापपर्यंत नवीन रस्ता गैरव्यवहाराची चौकशी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे : (**१) हे खरे आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १७.११.२०२१ रोजीचे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी चौकशी समितीने सर्वंकष चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेस अहवाल सादर केला होता. त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सुनावणी होऊन दोषी कंत्राटदारावर योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे याबाबत पुन्हा चौकशी करण्याची आवश्यकता नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## राज्यात अनुकंपा धारकांची भरती प्रक्रिया राबविण्याबाबत

**(१८) * ३८७६१ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुकंपा धारकांची भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजीचा अन्यायकारक शासन आदेश रद्द करण्याची मागणी अनुकंपा धारकांनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २३ एप्रिल, २००८ च्या शासन आदेशाप्रमाणेच अनुकंपा धारकांची भरती प्रक्रिया राबवावी अशी मागणी अनुकंपा धारकांकडून निवेदनाच्या माध्यमातून केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन आदेशाप्रमाणे अनुकंपा धारकांची भरती प्रक्रिया राबविल्यास अनेक अनुकंपाधारक लाभापासून वंचित राहणार असल्याचेही दिलेल्या निवेदनाच्या माध्यमातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २२डसिंबर, २०२१ रोजीच्या शासन आदेशाऐवजी दिनांक २३ एप्रिल, २००८ रोजीच्या शासन आदेशाप्रमाणे अनुकंपा धारकांची भरती प्रक्रिया राबवण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे, खरे आहे.

(३) व (४) सन २००८ मध्ये सरळसेवेच्या रिक्त पदांच्या ५% पदे अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध होत होती. शासन निर्णय दि.२३.०४.२००८ अन्वये दि.२२.०८.२००५ पूर्वीच्या प्रतीक्षासूचीतील उमेदवारांपैकी ५०% उमेदवारांची नियुक्ती पहिल्या वर्षी, २५% उमेदवारांची नियुक्ती दुसऱ्या वर्षी व उर्वरित २५% उमेदवारांची नियुक्ती तिसऱ्या वर्षी करण्याची आदेश होते.

दि.११.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीसाठी दरवर्षी सरळसेवेच्या रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% ची मर्यादा २०% पर्यंत वाढविण्यात आली. सदर मर्यादा ही दि.३१.१२.२०२१ रोजी संपुष्टात येणार होती. त्यामुळे दि.२२.१२.२०२१ च्या आदेशान्वये २०% ची मर्यादा पुढील तीन वर्षासाठी म्हणजेच दि.०१.०१.२०२२ ते ३१.१२.२०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

अनुकंपा नियुक्त्या तातडीने होण्याच्या अनुषंगाने यासंबंधीच्या कार्यपध्दतीमध्ये असणारा संभ्रम दूर करुन अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यास सहाय्यभूत होण्यासाठी दि.२६.०८.२०२१ च्या परिपत्रकान्वये अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानंतर विविध विभागांमधील अनुकंपा नियुक्तीचा आढावा घेण्यात आला असता गट-क च्या २,५५५ व गट-ड च्या १,०६७ अशा एकूण ३,६२२ उमेदवारांना सन २०२१ मध्ये अनुकंपा नियुक्ती देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रोहा (जि.रायगड) नगरपरिषदेत नगरोत्थान योजनेतून केलेल्या कामात कोट्यवधी रुपयांचा केलेला गैरव्यवहार

**(१९) * ३७६७९ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) नगरपरिषदेत नगरोत्थान योजनेतून रोहा नगरपरिषद क्षेत्रातील सोसायटया तसेच जुन्या गावठाणांमधून निघणारा मैला खुल्या गटारातून सोडला जात असल्याने पसरणारी दुर्गंधी व रोगराई यावर उपाययोजना म्हणून रोहा नगरपरिषदेने (जि.रायगड) एसटीपी प्लॅन्ट उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ मध्ये ओमकार ग्रुप कंपनीस सदर प्लॅन्टचे काम देण्यात येवून कंत्राटदार कंपनीने प्लॅन्टचे ७० टक्के काम पूर्ण केल्याचे व उर्वरित एसटीपी प्लॅन्टच्या कामासाठी ५ ते ६ कोटी म्हणजेच एकूण १२ ते १३ कोटी

रुपये खर्च येणार असल्याचे कंत्राटदाराकडून सांगण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरम्यानच्या काळात प्लॅन्टच्या उर्वरित कामासाठी नगरपरिषदेने मेर्सस निसर्ग कन्सल्टंट या कंपनीला सल्लागार म्हणून प्रकल्प व्यवस्थापनाने ठेका दिल्याचे व सदर सल्लागार कंपनीने त्यासाठी मुळच्या १३ कोटी ऐवजी ३२ कोटी रुपये इतका खर्च येणार असल्याचे व या वाढीव रक्कमेच्या अंदाजपत्रकांमध्ये नगरपरिषदेचे अधिकारी सामील असल्याचे दि. ६ जानेवारी, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशाप्रकारे कोटयवधी रुपयांचे आकडे वाढवून अंदाजपत्रक देणाऱ्या सल्लागार कंपनीची तसेच त्यामध्ये सामील असणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक जनतेकडून माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रोहा नगरपरिषदेच्या रुपये २८.८१ कोटी किंमतीच्या भुयारी गटार प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून सदर प्रकल्पामध्ये मलप्रक्रिया केंद्र (एसटीपी) चा समावेश आहे.

(२) रोहा नगरपरिषदेने रोहा शहर भुयारी गटार प्रकल्पाचे कार्यादेश मे. ओमकार ग्रुप्स, पुणे यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिले आहेत. यानुसार संबंधित कंत्राटदाराने प्रकल्पाचे ३१ % काम पूर्ण केले आहे.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने कंत्राटदाराने १६ किमी लांबीची भूमिगत गटार पाईपलाईन टाकण्याचे काम केले असून केलेल्या कामापोटी रुपये ९.०८ कोटी रुपये इतके देयक नगरपरिषदमार्फत कंत्राटदारास प्रदान करण्यात आले आहे. तसेच, प्रकल्पातील उर्वरित कामांसाठी प्रशासकीय मान्यतेनुसार उर्वरित संपूर्ण निधी खर्ची पडणार आहे. त्यामुळे, संपूर्ण भुयारी गटार प्रकल्प केवळ १२ ते १३ कोटी निधीमध्ये पूर्ण होणार असल्याची बाब खरी नाही असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) रोहा शहर भुयारी गटार योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकरिता मे. निसर्ग कन्सल्टंट यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून रोहा नगरपरिषदेने दिनांक ०८ जुलै, २०१० रोजी नेमणूक केली होती.

त्यानुसार मे. निसर्ग कन्सल्टंट यांनी सदर प्रकल्पाचे रुपये ३२.५९ कोटी किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले होते. तथापि, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांनी प्रकल्पास दिलेल्या तांत्रिक मान्यतेस अनुसरून २८.८१ कोटी किंमतीच्या रोहा शहर भुयारी गटार प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तद्नंतर, नगरपरिषदेच्या सल्लागारामार्फत वाढीव किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले नसल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) व (५) अशा प्रकारची मागणी करण्याबाबतचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

-----------------

## कात्रज (जिल्हा पुणे) येथील राजीव गांधी प्राणी संग्रहालय व वन्यप्राणी संशोधन केंद्रातील सुरक्षा व्यवस्थेबाबत

**(२०) * ३८४१५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रज (जिल्हा पुणे) येथील राजीव गांधी प्राणी संग्रहालय व वन्यप्राणी संशोधन केंद्र येथे सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे गैरप्रकार वाढत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राण्यांची चोरी, हल्ले, अनैसर्गिक मृत्यू तसेच चंदनाच्या झाडांची तस्करी इत्यादी घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संग्रहालयात कोट्यवधी रुपये खर्च करून सीसीटीव्ही कॅमेरे, दिवसरात्र सुरक्षा रक्षकांचा पहारा असतांना या घटना घडत असून जवळपास ४८ पेक्षा जास्त सुरक्षारक्षक कार्यरत दाखविले असतांना त्यापैकी काही सुरक्षारक्षक फक्त कागदोपत्रीच दर्शविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संग्रहालयाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ठोस पावले उचलण्याबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी सादर केले असूनही त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दि.५.०१.२०२२ रोजी राजीव गांधी प्राणी संग्रहालयात चंदन चोरी झाल्याचे निदर्शनास आले होते.

तथापि, त्याव्यतिरिक्त अन्य कोणताही गैरप्रकार त्या दरम्यान घडलेला नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

प्राणीसंग्रहालय सुरक्षेसाठी एकूण ३४ एवढे सुरक्षा रक्षक अधिकृत नोंदणीनुसार सदर प्राणी संग्रहालयात कार्यरत आहेत. त्यापैकी रात्रपाळी गस्तीसाठी १८ रखवालदार अंतर्गत परिसरात कार्यरत होते.

(४) व (५) या प्रकरणी मा.विधानसभा सदस्य, खडकवासला, पुणे यांनी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना लेखी पत्र दिले आहे.

संग्रहालयाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेने खालील उपाय योजना केलेल्या आहेत :-

- चंदन चोरी प्रकरणी पुणे महानगरपालिकेमार्फत संबंधीत पोलीस स्टेशनला दि.०६.०१.२०२२ रोजी फिर्याद नोंद करण्यात आली असून प्राणी संग्रहालयात होणाऱ्या चंदन चोरीस अटकाव होण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना कळविण्यात आले आहे.
- प्राणीसंग्रहालय सीमाभिंत भक्कम करण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी आवश्यक स्थापत्य विषयक देखभाल, दुरुस्तीचे कामकाज प्रगतीपथावर आहे.
- प्राणीसंग्रहालयात आवश्यक त्या संख्येत सुरक्षा रखवालदार नेमणूक करणेबाबत कार्यवाही केली जात आहे.
- पुढील आर्थिक वर्षात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या संख्येत वाढ केली जाणार आहे.

- ज्या ठिकाणी चोरीचा प्रकार घडला होता, त्या ठिकाणी गस्त घालणाऱ्या ८ खाजगी सुरक्षा कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आलेली असून सुरक्षा खात्याअंतर्गत कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांस कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

-----------------

## मुंबई कांदिवली (पूर्व) येथे विना नोंदणी सुरु असलेल्या खाजगी रुग्णालयांबाबत

**(२१) * ३७८०८ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथे रुग्णालयांची नोंदणी न करताच अनधिकृतपणे ५ रुग्णालये सुरु असल्याची माहिती समोर आली असून या रुग्णालयांच्या संचालकांना काम बंद करण्याबाबत तसेच त्यांच्यावर समता नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा दाखल केल्यानंतर देखील उक्त रुग्णालय सुरुच असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्टच्या तरतुदीनुसार मुंबईतील प्रत्येक रुग्णालय किंवा नर्सिंग होमची नोंदणी पालिका विभागात असणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने अशाप्रकारे विनानोंदणी रुग्णालये चालविणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

कांदिवली (पूर्व) येथील रुग्णालयांची तपासणी केली असता, ७ रुग्णालये विनानोंदणीकृत सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर रुग्णालयांना वारंवार निरीक्षण अहवाल देऊन त्यांच्या विरोधात बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ मधील तरतुदीनुसार मा. महानगर दंडाधिकारी, विलेपार्ले येथील न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच समता नगर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ४०/२०२१, ४१/२०२१ व १२३/२०२१ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) विनानोंदणी खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते:-

- बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ च्या तरतुदीनुसार निरीक्षण अहवाल देऊन खटले दाखल करण्यात येतात.
- खटले दाखल करण्यात आल्यानंतरही विनानोंदणी रुग्णालये सुरु असल्याचे निदर्शनास आल्यानंतर स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात येतात.
- मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ नुसार नोटीस देण्यात येते.
- म्हाडा प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात विनानोंदणी सुरु असलेल्या रुग्णालयांवर कारवाई करण्यासाठी म्हाडा प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.
- संयुक्त कारवाईदरम्यान अशा प्रकारच्या काही रुग्णालयांतील ऑक्सिजन सिलेंडर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिका सफाई कामगार वसाहत पुनर्विकास योजनेत झालेला गैरव्यवहार

**(२२) * ३७६६४ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा),**

**श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने सफाई कामगारांच्या ३९ वसाहतींच्या पुनर्विकासासाठी आश्रय योजना राबविली असून त्यासाठी १,८४४ कोटी रुपयांचे प्रस्ताव पालिकेत मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर आश्रय योजनेंतर्गत १२ वसाहतींच्या पुनर्विकासाच्या निविदा प्रक्रियेत किमान ३ कंपन्यांनी सहभाग घेऊन स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया होणे अपेक्षित असताना, तसे न करता ठाणे महापालिकेतील कंत्राटदार शायोना कार्पोरेशन या एकमेव कंपनीला सुमारे १६०० कोटी रुपयांचे काम देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्रय योजनेचे कंत्राट देताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आल्याने, उक्त प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश मा.राज्यपाल महोदयांनी लोकायुक्त यांना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदशर्नास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मूळ योजनेनुसार ३३ लाख चौरस फुटांचे बांधकाम मंजूर होते, परंतू कंत्राटदारांनी यात वाढ करून ते ७९ लाख चौरस फुटांपर्यंत वाढवून ते पालिकेनेही मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईतील सफाई कामगारांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेतून मालकी हक्काची घरे देणे शक्य असतानाही मालकी हक्कांच्या घरांऐवजी ‘सेवा निवासस्थानाचा’ पर्याय दिला, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय व पालिका आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने महापालिकेतील संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या वसाहतींचा पुर्नविकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुमारे २९८१६ सफाई कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने पुरविण्याकरीता सद्यस्थितीत असलेल्या ३५ वसाहतींचा आश्रय योजने अंतर्गत महानगरपालिकेने पुनर्विकास करण्याचे नियोजिले असून त्याकरीता ३५०० कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत.
(२) सदर ३५ वसाहतींचा पुनर्विकास करण्यासाठी ११ गट तयार करुन डिझाइन ॲण्ड बिल्ट टर्नकी बेसिस (Design and Built Turnkey Basis) च्या निविदांकरीता महानगरपालिका आयुक्तांची मान्यता घेऊन वृत्तपत्रांमध्ये दिनांक ११.०९.२०१९ रोजी प्रथम जाहिरात प्रकाशित करण्यात आली. तथापि, निविदांमध्ये येत असलेल्या विविध अडचणी व तांत्रिक कारणास्तव सदर निविदांची मुदत, २ परिशिष्ट व ५ शुध्दिपत्रकांद्वारे विविध अटी व शर्ती सहीत दिनांक २९.०२.२०२० पर्यंत वाढविण्यात आली. तथापि, कमी प्रतिसादामुळे व झालेल्या बऱ्याच बदलांमुळे सदर निविदा रद्द करण्यात आली.

तद्नंतर महानगरपालिका आयुक्तांच्या मंजूरीने दिनांक २८.०४.२०२० रोजीच्या वृत्तपत्रास जाहिरात प्रकाशित करुन फेर-निविदा मागविण्यात आल्या. तद्नंतर गट २ व गट ३ च्या (१२ वसाहतींच्या) निविदांना ९ वेळा मुदतवाढ व अंदाजे ५ महिने कालमर्यादा देऊनही दिनांक ०६.११.२०२० रोजी प्रत्येकी १ अंतिम प्रतिसाद प्राप्त झाला.

सफाई कमगारांच्या वसाहती या सन १९६० दरम्यानच्या असून सद्यस्थितीत जीर्णावस्थेत आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार व जिवितहानी टाळण्यासाठी सदर वसाहतींचा पुनर्विकास करणे गरजेचे होते.

निविदांना ९ वेळा मुदतवाढ व अंदाजे ५ महिने कालमर्यादा देऊनही येणारा अल्प प्रतिसाद व निविदा प्रक्रियेत होत असलेला कालपव्यव लक्षात घेऊन गट-२ व गट-३ (१२ वसाहतींचा पुनर्विकास) या निविदांचे एकमेव प्रतिसाद असलेले लिफाफे महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरीने उघडण्यात आले. सदर प्रतिसाद हा मे. शायोना कॉर्पोरेशन यांचा होता.

(३) मे. शायोना कॉर्पोरेशन या कंत्राटदाराची आर्थिक क्षमता न तपासता कंत्राट दिल्याच्या वृत्तपत्रामधील बातमीच्या अनुषंगाने स्वाधिकारे चौकशी करण्याकरीता, सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश मा. लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २०.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस दिले होते. त्यानुषंगाने महानगरपालिकेने माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये मा. लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना अहवाल सादर केला आहे.

(४) सदर ३५ वसाहतींचा आश्रय योजनेंतर्गत डिझाइन ॲण्ड बिल्ट टर्नकी बेसिस (Design and Built Turnkey Basis) वर निविदा काढण्याचा निर्णय झाल्यावर एक आधाररेषा म्हणून ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन महानगरपालिकेमार्फत क्षेत्रफळ निश्चित करण्यात आले. तथापि, कंत्राटदारांनी आराखडे सादर करताना प्रत्येक ठिकाणच्या वसाहतींसाठी लागू असलेले अधिकतम चटईक्षेत्र व फंजिबल चटईक्षेत्र गृहित धरुन आराखडे सादर केले. तसेच नवीन विकास नियंत्रण नियमावलीनुसार काही निर्बंध शिथील झाल्यामुळे काही ठिकाणी पूर्ण चटईक्षेत्र व फंजिबल चटईक्षेत्र वापरणे शक्य झाले. अशा विविध कारणांमुळे एकूण बांधकाम क्षेत्रात वाढ झाली. तथापि, महानगरपालिकेमार्फत अंतिमत: मंजूर होणारे क्षेत्रफळच अंतिम व बंधनकारक राहिल असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्यामध्ये एकूण २९८१६ कायम सफाई कामगार आहेत. सद्यस्थितीत सुमारे ६००० कामगारांकरीता सेवासदनिका देण्यात आल्या आहेत. तसेच अस्तित्वात असलेल्या सफाई कामगाराच्या वसाहतींच्या भूखंडावर आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करुन अंदाजे १४००० घरे बांधण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सफाई कामगारांसाठी मालकी हक्काची घरे बांधण्याकरीता महापालिका हद्दीत जागा उपलब्ध नसल्यामुळे प्रथमत: सेवानिवासस्थाने उपलब्ध करुन देऊन तद्नंतर जागा उपलब्ध झाल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत मालकी हक्काच्या सदनिकांसाठी प्रक्रिया राबविणे शक्य होईल असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) हे खरे आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने ग्राहकांना जास्त रकमेची देयके पाठविल्याबाबत

**(२३) * ३९२४८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागाने स्मार्ट सिटी योजनेतर्गत १२१ कोटी रुपये खर्च करून शहरातील सर्व नळ पाणी पुरवठा योजनांवर शंभर टक्के स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सन २०१९ मध्ये करण्यात येवून पाणी वापराप्रमाणे देयक येण्याची अपेक्षा असतांना पाणी मीटर बंद असूनही ग्राहकांना लाखो रुपयांची देयके पाठविली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतंर्गत १२१ कोटी खर्च करून बसविण्यात आलेले स्मार्ट मीटर नादुरुस्त व दोषयुक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नादुरुस्त किंवा दोषयुक्त मीटर बसविणाऱ्या ठेकेदारावर व ठेकेदारास पाठीशी घालणाऱ्या पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन १२१ कोटी रुपयांच्या खर्चाची वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा होत आहे अशा ग्राहकांच्या नळ संयोजनांवर स्मार्ट वॉटर मीटर बसविणे व त्यांचे ५ वर्षांसाठी परिचालन, देखभाल व दुरुस्ती करणे बाबतचा प्रकल्प ठाणे स्मार्ट सिटी व ठाणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेकडून कळविण्यात आल्यानुसार सद्यस्थितीत प्रस्तावित एकूण जलमापकांपैकी ६५ टक्के जलमापके बसविण्यात आली असून, उर्वरीत जलमापक बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

ठाणे महानगरपालिकेमार्फत जलमापकाचा वापर सुरु केल्यामुळे ग्राहकांना पाण्याच्या वापरानुसार देयक अदा करावे लागत आहे. तथापि, सदर बसविण्यात आलेल्या जलमापकांपैकी ज्या ग्राहकांना वापरापेक्षा जास्त रकमेची देयके देण्यात आल्याचे आढळून आले, अशा जलमापकांची तपासणी करून देयकांमध्ये आवश्यक ते बदल करून देण्यात येत आहेत.

(२), (३) व (४) सदर योजनेंतर्गत १,१३,३२८ जलमापक बसविणे प्रस्तावित असून त्यापैकी ७४,१८१ एवढे जलमापक बसविण्यात आलेले आहेत. यापैकी ४८,२०० जलमापकांच्या नोंदीनुसार पाणी देयके ग्राहकांना देण्यात आली आहेत. सदर जलमापकांपैकी ८०० जलमापक दोषयुक्त / नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

सद्यस्थितीत सदर ८०० नादुरुस्त जलमापक दुरुस्त करण्याची / बदलण्याची कार्यवाही संबंधित ठेकेदारामार्फत सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेकडून कळविण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिका मुख्यालयात जलमापकासंबंधीत तक्रारींकरीता सेंट्रल कंट्रोल रुम स्थापन करण्यात आला असून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा तक्रार निवारण कक्षामार्फत नियमित कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडून कळविण्यात आले आहे.

-----------------

## नागभीड (जि.चंद्रपूर) नगर परिषदेच्या अग्निशमन वाहन खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(२४) * ३८६८९ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (जि.चंद्रपूर) नगर परिषदेत अग्निशमन वाहन खरेदी तसेच इतर अनेक बाबींमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब लेखा परिक्षणाच्या अहवालातून माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे वृत्त दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजीच्या "दैनिक देशोन्नती" या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते.

(२) व (३) उपरोक्त दैनिकातील वृत्तात, लेखापरीक्षण अहवालाच्या अनुषंगाने नागभीड नगरपरिषदेत गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी काही नगरसेवकांनी मा.पालकमंत्री महोदयांना दिल्याचे नमूद केले होते.

नगरपरिषदेचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखा परिक्षा यांच्याकडून प्रत्येक वर्षी केले जाते. लेखापरिक्षणातील आक्षेप संबंधीत नगरपरिषदेस कळविले जातात. नगरपरिषदेकडून त्या आक्षेपांना उत्तर देण्यात येते व ती उत्तरे विचारात घेऊन आक्षेप वगळावे किंवा कसे, याबाबतचा निर्णय स्थानिक निधी लेखा परिक्षा यांच्याकडून घेतला जातो. ही नियमित चालणारी प्रक्रिया आहे.

नागभीड नगरपरिषदेने अग्नीशमन वाहन खरेदी संदर्भातील आक्षेपास स्थानिक निधी लेखा परिक्षा यांना उत्तर दिले आहे. दरम्यान खरेदी करण्यात आलेले अग्नीशमन वाहन संचालक, अग्नीशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी दिलेल्या तांत्रिक मंजूरीमध्ये नमूद केलेल्या मानकांप्रमाणे (Specifications) आहे का? हीच मानके निविदेत नमूद होती का? तसेच निविदाकारास अग्नीशमन वाहनाची जी किंमत प्रदान करण्यात आली ती त्यावेळचे बाजारातील

दर विचारात घेता, योग्य होती किंवा कसे, याबाबतचा अहवाल संचालक, महाराष्ट्र अग्नीशमन सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आला आहे.

अन्य आक्षेपासंदर्भात स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालयाशी संपर्क साधून नगरपरिषदेने केलेले खुलासे स्विकारण्यात आले किंवा कसे? याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचा अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आनंदवल्ली (जि.नाशिक) येथील सर्व्हे नंबर ६५ मध्ये खाजगी विकासकाकडून सुरू असलेले नियमबाह्य बांधकाम

**(२५) * ३८४८१ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनंदवल्ली (जि.नाशिक) येथील सर्व्हे नंबर ६५ मध्ये खाजगी विकासकाकडून सुरू असलेले बांधकाम हे नियमाचे भंग करून सुरू असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदी किनारी १८ मीटर डीपी रस्त्यासाठी महापालिकेने भूसंपादन केले असून, त्यातील १४०० मीटर जागाच गायब असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची मेरीसारख्या तटस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही,

नाशिक महानगरपालिकेने मौजा आनंदवल्ली सर्व्हे नंबर ६५/१/१अ मधील इमारत बांधकामाबाबत सॉफटवेअरव्दारा ऑनलाईन पद्धतीने बांधकाम परवानगी जा.क्र.एलएनडी/बी.पी./आनंदवल्ली/ डीसोआर/ १४२३/२०१९, दिनांक २७/०७/२०१९ अन्वये तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांच्या मोजणी नकाशानुसार, पाटबंधारे विभागाने निश्चित केलेल्या पुररेषेच्या अधिन राहून व समतल दर्शक नकाशानुसार (पी.टी.शीट) दिली आहे.

(२) नाही,

नाशिक शहरासाठी मंजूर सुधारित विकास योजनेनुसार मौजे आनंदवल्ली सर्व्हे नंबर ६५ मधील गोदावरी नदीच्या उजव्या तीरावरील नदीकिनारी गोदापार्कसाठी क्षेत्र आरक्षित आहे. नाशिक महानगरपालिकेने उक्त जागेपैकी सदर गोदापार्कसाठी आरक्षित सुमारे १४०० चौरस मीटर क्षेत्र संपादित केले आहे. सदर आरक्षित क्षेत्र सोडूनच नाशिक महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली आहे.

(३) व (४) होय.

श्री. अशोक फकिरराव सोपे व इतर यांचे ज.मु. शिंदे अॅण्ड शिंदे बिल्डर्स यांना नाशिक महानगरपालिकेने जा.क्र.नरवि/वशि/अ-१/२३०/२०२० दिनांक १९/०६/२०२० रोजी संरक्षक भिंतीचे खोदकाम बंद करणेबाबत त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २६४,२६५,२६६, व ४७८ चे तरतुदीनुसार प्राप्त अधिकाराप्रमाणे नोटीस देण्यात आलेली होती. सदर नोटीसीस जागामालक यांचेमार्फत अॅडव्होकेट श्री.नंदकिशोर लाहोटी यांनी दिनांक २४/०६/२०२० रोजी नाशिक महानगरपालिकेस उत्तर दिलेले आहे.

तदनंतर स्थानिक प्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने जागामालक श्री.अशोक फकिरराव सोपे व इतर ज.मु.धारक विकसनकर्ता श्री.शिंदे अॅण्ड शिंदे, व्दारा आर्किटेक्ट श्री. संजय रमेश नाईक यांना प्रथम नोटीस जा.क्र.ननिवि/वशि/अे१/ २६/२०२१, दिनांक २३/१२/२०२१ रोजी व अंतिम नोटीस जा.क्र. ननिवि/वशि/८४/२०२२ दिनांक १२/०१/२०२२ अन्वये देण्यात आली आहे. सदर प्रकरणी श्री.अशोक फकिरराव सोपे व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.५९९/२०२२ दाखल केली. सदर रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी “वादी यांना सुनावणी

दिल्याशिवाय बांधकामाबाबत कोणतीही कठोर कारवाई करण्यात येऊ नये", असे आदेश दि.१९/०१/२०२२ रोजी पारित करुन उक्त रिट याचिका निकाली काढली आहे.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशाच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने जागामालक श्री.अशोक फकिरराव सोपे व इतर यांना दिनांक ०८/०२/२०२२ रोजी सुनावणी दिलेली आहे व सुनावणी संबंधीचे आदेश कार्यकारी अभियंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दिनांक ११/०२/२०२२ रोजी पारित केले आहेत. सदर दि.११/०२/२०२२ रोजीच्या आदेशात "गोदापार्कसाठी आरक्षित व संपादित सुमारे १४०० चौरस मीटर क्षेत्राच्या हद्दी निश्चित करुन तसेच सदरचे क्षेत्र समतल करुन नाशिक महानगरपालिकेकडे नियमानुसार हस्तांतरीत करावे व विनापरवाना बांधलेल्या संरक्षक भिंतीची व जागेतून जाणा-या नाल्यासंबंधीची रितसर परवानगी संबंधित विभागाकडून घ्यावी व परवानगची प्रत नाशिक महानगरपालिकेकडे देण्यात यावी व नाशिक महानगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीनुसार जागेवर बांधकाम करावे " असे नमुद केले आहे.

(५) लागू नाही.

-----------------

## नगरपरिषद नांदुरा (जि.बुलढाणा) अंतर्गत हद्दवाढ झालेल्या भागाच्या विकासासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत

**(२६) * ३९३८५ श्री.राजेश एकडे (मलकापूर)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा नगरपरिषद (जि. बुलढाणा) येथे सन २०१६ मध्ये हद्दवाढ झालेली असून हद्दवाढ झालेल्या भागातील नागरिकांना अद्यापही पाणी, रस्ते, नाले, आरोग्याबाबतच्या सुविधा उपलब्ध नसल्याने लोकप्रतिनिधी यांनी यासाठी विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केल्याचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हद्दवाढ झालेल्या भागातील नागरिकांच्या मूलभूत सेवा-सुविधा पूर्ण करण्यासाठी नगरपरिषद नांदुराकडे कोणताही पर्याप्त निधी शिल्लक नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन या भागातील नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा मिळण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नांदुरा नगरपरिषद, जि.बुलढाणा ची हद्दवाढ शासन अधिसूचना दिनांक २७ जानेवारी, २०१६ अन्वये झाली असून हद्दवाढ भागात विकासकामांसाठी निधी उपलब्ध करण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे.
(२), (३) व (४) "नगरपालिका / नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या क्षेत्रांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य" या योजनेंतर्गत संबंधित नगरपालिका / नगरपरिषदांना विकास कामासाठी शासन अनुदान उपलब्ध करण्यात येतो.

याबाबतचे निकष शासन निर्णय दिनांक २७ जून, २०१२ अन्वये निश्चित करण्यात आले आहेत.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय निधी, प्रत्यक्ष वितरणासाठी उपलब्ध होणारा निधी व मागण्या यांच्या अधीनतेने निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई शहरातील सर्व इमारतींचे फायर ऑडिट व इलेट्रिक ऑडिट करण्याबाबत

**(२७) * ३७८९३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम),**

**श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील ताडदेव येथील नाना चौकाजवळ असणाऱ्या कमला या २० मजली इमारतीला लागलेल्या आगीमध्ये ६ रहिवाशांचा मृत्यु झाला तर २४ जण जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्र कार्यान्वित नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महापालिका आयुक्त यांनी उपायुक्त (परिमंडळ २) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली असून, सदर चौकशी समिती १५ दिवसांत अहवाल सादर करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील ८८७ रुग्णालयांकडे अग्निसुरक्षेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून, मा.न्यायालयापुढे महापालिकेने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार मुंबईत एकुण १५७४ रुग्णालयांची पाहणी केली असता ६८७ रुग्णालयांकडे अग्निसुरक्षेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र असून ८८७ रुग्णालयांना नोटीस पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेल्या काही महिन्यांत राज्यातील सहा रुग्णालयांना लागलेल्या आगीत ६० पेक्षा जास्त जणांना आपला जीव गमवावा लागला असून, उपरोक्तप्रमाणे ८८७ रुग्णालयांना दिलेल्या नोटीसीनुसार अद्यापपर्यंत किती रुग्णालयांनी अग्निसुरक्षेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र मिळविले आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील सर्व रुग्णालयांचे फायर ऑडिट व इलेक्ट्रीक ऑडिट करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सचिनम हाईटस्, भाटीया हॉस्पिटलजवळ, साखळी इस्टेट, ताडदेव रोड, मुंबई या इमारतीला आग लागल्याची वर्दी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलास दिनांक २२.०१.२०२२ रोजी सकाळी

०७.२५ वाजता प्राप्त झाली. सदर दुर्घटनेमध्ये २१ व्यक्ती जखमी व ९ जणांचा मृत्यू झाला. इमारतीमध्ये बसविलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नव्हती, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त यांनी पारित केले आहेत. त्यानुसार उप आयुक्त (परिमंडळ २) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीची नियुक्ती करण्यात आली असून प्राथमिक चौकशीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(३) व (४) मुंबईमधील एकूण १५७४ रूग्णालयांपैकी ६८७ रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षेविषयक त्रुटी आढळून आल्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अंतर्गत महानगरपालिकेमार्फत त्यांना नोटीस (Form J) बजाविण्यात आल्या होत्या. ६८७ रुग्णालयांपैकी ६६३ रूग्णालयांनी विहीत कालावधीमध्ये नोटीसमध्ये दिलेल्या त्रुटींची पूर्तता केली आहे. उर्वरीत २४ रूग्णालयांनी अग्निसुरक्षा विषयक अटी व शर्तींची पूर्तता विहीत वेळेत केली नसल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये महानगरपालिकेमार्फत कारवाई सुरू आहे.

(५) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ३ (३) नुसार, इमारतीचे मालक/भोगवटादार यांनी इमारतीमधील अग्निप्रतिबंधक यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतची माहिती प्रपत्र 'ब' द्वारे लायसन्स प्राप्त अभिकरणमार्फत अग्निशमन दलास वर्षातून दोन वेळा माहे जानेवारी व जुलै महिन्यात सादर करणे बंधनकारक आहे.

उद्योग विभागामार्फत राज्यातील ३८५० सार्वजनिक आणि खाजगी कोव्हीड रुगणालयांची विद्युत सुरक्षिततेच्या दृष्टीने निरीक्षणे करण्यात आली असून त्यामध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधित रुग्णालयांना ज्ञापन देण्यात आली आहेत. सदर निरीक्षणादरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या आधारे, विद्युतीय कारणांमुळे होणाऱ्या आगीच्या घटनांना आळा घालणेकरीता प्रतिबंधात्मक उपाय योजनांबाबत दिनांक २७.०८.२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

नगर विकास विभागामार्फत दिनांक १५.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, रुग्णालयाचे आग / ऑक्सीजन / स्ट्रक्चरल / इलेक्ट्रीकल ऑडीट वेळोवेळी करण्याच्या सूचना सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका / नगरपरिषद यांना देण्यात आल्या आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील ५२८ आरोग्य संस्थांपैकी ४३८ आरोग्य संस्थांना अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी २७० आरोग्य संस्थांमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. तसेच १३ आरोग्य संस्थांना अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तसेच राज्यातील ५२५ रुग्णालयांमध्ये अग्निप्रतिबंधाचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका प्रशासनाची बनावट कागदपत्रे व बोगस बँक गॅरंटी सादर करुन फसवणूक केल्याबाबत

**(२८) * ३८३६३ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाअंतर्गत रस्ते व गटार सफाई कंत्राट मिळविण्यासाठी मे.सेक्युअर आयटी फॅसिलिटी मॅनेजमेंट या कंपनीने माहे डिसेंबर, २०२१ मध्ये बनावट कागदपत्रे व बोगस बँक गॅरंटीसह महापालिकेस प्रस्ताव सादर करुन महापालिका प्रशासनाची फसवणूक करुन तब्बल ५५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत स्थानिक जनतेकडून व लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे तक्रारी केल्या असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने इंदापूर नगरपरिषद आणि तूळजापूर (जि. उस्मानाबाद) येथील मुख्याधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी करुन अनुभव कागदपत्रे आणि बोगस लेटरहेड्स पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनास सादर केल्याचे तसेच स्टेट ऑफ इंडिया, फोर्ट, मुंबई या बँक शाखा व्यवस्थापनाने सदरचे बँक गॅरंटी बनावट असून असे कोणतेही बँक गॅरंटी बँक प्रशासनाने दिले नसल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजीच्या महापालिका सर्वसाधारण सभेत महापालिका

लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी महापालिका प्रशासनाने अद्याप कारवाई न केल्यामुळे, त्याबाबत सखोल चौकशी करण्यात येऊन बनावट कागदपत्रे व बोगस बँक गॅरंटी सादर करुन महापालिकेची व पर्यायाने शासनाची फसवणूक करणाऱ्या कंपनीविरुध्द तसेच त्यामध्ये सामील असणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करावी, अशी मागणी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पत्रान्वये सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने सर्व संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) याबाबत मा.विधानसभा सदस्य, देवळाली मतदार संघ, नाशिक यांचे दि.१९.०१.२०२२ रोजी पत्र प्राप्त झालेले आहे.

(२), (३) व (४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे मे.सेक्युअर आय.टी. फॅसिलीटी मॅनेजमेंट प्रा.लि. यांनी इंदापूर नगरपरिषद व तुळजापूर नगरपरिषद येथील मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीची अनुभव प्रमाणपत्र सादर केली होती.

तथापि, या प्रकरणी दि.२१.१२.२०२१ रोजी महासभा, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे बनावट कागदपत्रे सादर केल्याबाबत चर्चा झालेली होती.

सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी प्राथमिक तपासणी केली असता, इंदापूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्राबाबत इंदापूर नगरपरिषदेत कोणतीही नोंद नसल्याचे मुख्याधिकारी, इंदापूर नगरपरिषद यांनी कळविले आहे.

तसेच सदर संस्थेने दि.१२.११.२०२१ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेची बँक गॅरंटी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सादर केली.

तथापि, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तपासणी केली असता सदर बँक गॅरंटी बँकेमार्फत दिली नसल्याचे आढळून आले.

त्यास अनुसरून दि.११.०२.२०२२ रोजी संबंधीत पोलीस स्टेशनला महानगरपालिका प्रशासनाने गुन्हा नोंद केलेला असून याप्रकरणी पोलीस यंत्रणेमार्फत तपास सुरू आहे.

त्यामुळे रस्ते व गटर्स सफाई बाबतच्या प्रस्तुत कामाचे कार्यादेश अथवा पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

मा.विधानसभा सदस्य, देवळाली मतदार संघ, नाशिक यांच्या दि.१९.०१.२०२२ च्या पत्रास अनुसरून आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असून या प्रकरणी तपासणी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणार (जि.बुलढाणा) येथील जगप्रसिध्द खाऱ्या पाण्याच्या सरोवराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची दूरवस्था झाल्याबाबत

**(२९) * ४१४३९ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार (जि.बुलढाणा) येथील जगप्रसिध्द खाऱ्या पाण्याचे सरोवर पाहण्यासाठी जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोठे खड्डे पडल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम तातडीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशंत: खरे आहे.

मेहकर ते अजिसपुर ह्या राष्ट्रीय महामार्गाचे म.रा.र.वि. महामंडळाच्या बुलढाणा शिबीर कार्यालयाद्वारे बांधकाम पुर्ण केले आहे व तो लोणार शहरातुन

जातो. सदर रस्त्याची एकुण लांबी ३५.८३६ कि.मी. पैकी ०.२०० कि.मी.लांबी मध्ये खड्डे आहेत.

(२) सद्य:स्थितीत सदर खड्डे तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात आलेले आहेत. त्यामुळे पर्यटकांना गैरसोयीचे होत असल्याचे दिसुन येत नाही.

(३) खराब झालेल्या ०.२०० कि.मी. लांबीची दुरुस्तीची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ओशिवरा (मुंबई) येथील ओशिवरा मॅटरनिटी होम नुतनीकरणाच्या नावाखाली गोरेगाव येथे स्थलांतरीत केल्याबाबत

**(३०) * ३८७४३ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओशिवरा (मुंबई) येथील ओशिवरा मॅटरनिटी होम नुतनीकरणाच्या नावाखाली गोरेगाव येथे स्थलांतरीत करण्यात आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थलांतरण करुन एक वर्षाचा कालावधीत उलटूनही मॅटरनिटी होमच्या इमारत बांधण्याची निविदा अद्याप निघालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एस.व्ही.पी.नगर येथे महानगरपालिकेची मॅटरनिटी होमची चार मजली इमारत बांधलेली असतानासुध्दा ओशिवरा मॅटरनिटी होम गोरेगाव येथे स्थलांतरीत केले असून सदर ठिकाणी कूपर रुग्णालयातील डॉक्टरांसाठी वसतीगृह सुरु केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे वर्सोवा व ओशिवरा विभागातील असंख्य गरोदर महिलांची तपासणी व उपचाराची गैरसोय होत असल्याने उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार तक्रार दाखल करुनसुध्दा कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ओशिवरा प्रसुतीगृहाच्या नुतनीकरणाची कार्यवाही सुरु असून, सदर प्रसुतीगृह दिनांक २४.०८.२०२० पासून टोपीवाला प्रसुतीगृह, गोरेगांव (पश्चिम) येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

(२) सदर भूखंड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) यांच्या हद्दीत येतो. सदर भूखंडावर आवश्यकतेनुसार तळघर + तळमजला + ११ मजले असे महिला व बाल रुग्णालयाचे आराखडे महापालिका वास्तुशास्त्रज्ञ विभागामार्फत तयार करण्यात आले असून, सदर आराखड्यांना मान्यता घेऊन सदर आराखडे एम.एम.आर.डी.ए. च्या मान्यतेकरिता सादर करण्यात आले आहेत.

सदर आराखड्यास एम.एम.आर.डी.ए. ची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा मागवून प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होणार आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) ओशिवरा प्रसुतीगृह सुरु असतांना, एस.व्ही.पी. नगर येथे महानगरपालिका प्रसुतीगृहाची चार मजली इमारत रिक्त असल्याने, सदर इमारत सन २०१९ मध्ये कुपर रुग्णालयातील डॉक्टरांच्या हॉस्टेलसाठी तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आली आहे.

तसेच कुपर हॉस्पिटलची एक इमारत पूर्ण झाल्यावर सदर हॉस्टेल एस.व्ही.पी. नगर येथून स्थलांतरीत करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) वर्सोवा व ओशिवरा विभागातील गरोदर महिलांना उपचार/तपासणी करण्यासाठी प्रसुतीगृहाबाबत आरोग्य केंद्रामार्फत योग्य मार्गदर्शन करण्यात येते. तसेच विभागातील स्थानिक नगरसेवक व नागरिकांना अवगत करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने विभागातील गरोदर महिला गोरेगांव प्रसुतीगृह येथे येत असून, त्यांची ओशिवरा प्रसुतीगृहात नोंदणी केली जाते व ओशिवरा प्रसुतीगृहामार्फत त्यांना सर्व सेवा पुरविली जाते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## मुंबईतील मालाड येथील ओमकार समुहातर्फे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत

**(३१) * ३८३९९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पूर्व, कोकणी पाडा, संतोष नगर, कुरार गांव या तीन ठिकाणच्या गृहनिर्माण संस्थांचे ओमकार समुहातर्फे ५ हजार झोपडीधारकांसाठी राबविण्यात येत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पाचे विकास काम गत ७ वर्षापासून अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओमकार समुह कंपनीच्या विकासकास बँक कर्ज व झोपडीपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत गैरव्यवहार प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने अटक करुन त्यांच्या मालकीची ४१० कोटी रुपयाची मालमत्ता दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकासकाच्या अटकेच्या कारवाईमुळे गत ७ वर्षापासून प्रलंबित असलेल्या झोपडीपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत प्रकल्पातील सुमारे ५ हजार झोपडीधारकांची घरासाठी होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने उक्त प्रकल्प ताब्यात घेऊन राबविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) अंशत: खरे आहे.

कोकणीपाडा आणि कुरार गांव या जागेतील मिळकतीवर जानू भोये नगर सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच इतर संस्था आणि जय हनुमान कोकणीपाडा सहकारी गृहनिर्माण संस्था व इतर संस्था यांच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना आहेत. सदरहू योजनांचे विकासक मे.ओमकार रियल्टर्स आणि डेव्हलपर्स प्रा.लि. असून जलधारा सहकारी गृहनिर्माण संस्था व इतर संतोष नगर यांचे विकासक मे.व्हि.जी.एस. कंन्स्ट्रक्शन आहेत.

जानू भोये नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये एकूण ३४३३ झोपडीधारक असून २७७२ पात्र झोपडीधारकांपैकी २२०० पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

जय हनुमान कोकणीपाडा सहकारी गृहनिर्माण संस्था व इतर संस्थांमध्ये एकूण ५९६ झोपडीधारक असून सद्य:स्थितीत जागेवरील झोपड्या निष्कासित करण्यात आलेल्या नाहीत. तसेच जलधारा सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये (संतोषनगर) ७८५ झोपडीधारक असून ६२५ पात्र झोपडीधारकांपैकी ६१६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

वरील प्रकल्पामधील पुनर्वसन घटकाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) ओमकार समूह कंपनीच्या विकासकास सक्तवसुली संचालनालयाने अटक केल्याची बाब खरी आहे.

(३) सदर दोन्ही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत २८१६ सदनिकांधारकांना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले असून २८१६ झोपडीधारकांचे पुनर्वसन पूर्ण झालेले आहे. तसेच उर्वरीत सदनिकांचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेमध्ये एकाच मालकाने विविध कंपन्यांच्या नावाने स्टेशनरी पुरवठा करुन केलेला गैरव्यवहार

**(३२) * ३७९०३ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतील आरोग्य विभागामध्ये सुमारे ६७ लाख रुपयांच्या स्टेशनरी पुरवठ्यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच कंत्राटदाराने मे.मनोहर साकोरे ॲन्ड कंपनी, मे.स्वस्तीक ट्रेडींग कंपनी, मे.गुरूकृपा स्टेशनरी, मे.एसके इंटरप्रायझेस व मे.सुदर्शन कंपनी या नावाने स्टेशनरीचा पुरवठा केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिकेतील विविध विभाग तथा शहरातील विविध झोन कार्यालयांमध्ये स्टेशनरी पुरवठ्याची चौकशी करण्याकरीता चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशी अहवालात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामध्ये रू.६७ लाख किमतीचा स्टेशनरी घोटाळा झाल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये प्रथमत: निदर्शनास आले. तथापि याबाबत नियुक्त समितीच्या चौकशी अहवालानुसार वैद्यकीय आरोग्य विभागाबरोबरच घनकचरा व्यवस्थापन, जन्ममृत्यु विभाग व ग्रंथालय विभाग अशा एकूण चार विभागात एकूण रु.५.४१ कोटी इतक्या रकमेची चुकीची प्रदाने झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

या गैरव्यवहारात समाविष्ट एजेन्सीचे मालक वेगवेगळे आहेत. यापैकी मनोहर साकोडे ॲन्ड ब्रदर्स व मे. गुरूकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिंटर्स या एजेन्सीचे मालक प्रो. मनोहर ज. साकोडे हे आहेत. उर्वरित मे. स्वस्तिक ट्रेड लिंक चे मालक प्रो. अतुल मनोहर साकोडे, मे.एस.के. इंटरप्राजेस नागपूर चे मालक प्रो.सुषमा के. साकोडे, मे. सुदर्शन पेपर कनर्व्हटिंग चे मालक प्रो. कोलबा ज. साकोडे हे आहेत. तसेच ग्रंथालय विभागामध्ये मे.गणेश साई कृपा सर्विसेस यांनी बनावट देयके सादर केली आसून या एजन्सीचे मालक प्रो.निलेश भगत आहेत.

(३) हे खरे आहे.

सदर प्रकरणी अतिरिक्त आयुक्त (सामान्य) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.तसेच महानगरपालिकेच्या महासभेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० अन्वये सत्तापक्ष नेता यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) चौकशी समितीच्या अहवालानुसार वैद्यकीय आरोग्य विभागात एकूण १३१ देयके/नस्त्याद्वारे २.१५ कोटी, घनकचरा व्यवस्थापन विभागात एकूण ३३ देयके/नस्त्याद्वारे रू.१.२३ कोटी, जन्ममृत्यु विभागात एकूण ४८ देयके/नस्त्याद्वारे रू.१.२९ कोटी, ग्रंथालय विभागात एकूण ४७ देयके/नस्त्याद्वारे रू.७४.२९ लक्ष असे एकूण ५.४१ कोटी इतक्या रकमेची चुकीची प्रदाने झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणाशी संबंधित कंत्राटदारावर आरोग्य विभागामार्फत सदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाशी संबंधीत कंत्राटदाराला व कर्मचाऱ्यांना पोलिसांमार्फत अटक करण्यात आली आहे. पोलीस विभागाद्वारा सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा नागपूर शहर, नागपूर यांचेकडे सोपविण्यात आला आहे.

महानगरपालिकेने कंत्राटदार एजन्सीला काळ्या यादीत टाकले आहे. सदर कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच प्रकरणाशी संबंधित १९ अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी महानगरपालिका स्तरावर करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त वैद्यकीय आरोग्य विभागाचे लोकल फंडद्वारे लेखापरिक्षण करण्याची महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील वशिष्ठी नदीवरील पूलाची (एन्रॉन पूल) दुरुस्ती करण्याबाबत

**(३३) * ३९३९२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरात दिनांक २१ व २२ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमध्ये पाण्याखाली जाऊन प्रचंड प्रमाणात वित्तहानी होवून त्यामध्ये मुंबई-गोवा हायवे मौजे पेढे-परशुराम ते गुहागर रोड या बायपास मार्गावरील वशिष्ठी नदीवरील पूल (एन्रॉन पूल) खचून गत ६ महिन्यांपासून वाहतुकीसाठी बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक असूनही त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने गत ६ महिन्यांपासून वाहनधारकांना सुमारे ८ किलोमीटरचा वळसा घालावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अत्यंत तातडीच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करुन उक्त पुलाची तातडीने दुरूस्ती करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वशिष्ठी नदीवरील क्षतिग्रस्त पूलाच्या उर्ध्व बाजूस ४०० मीटर अंतरावर असलेल्या फरशी पुलावरुन एकेरी वाहतुक सुरु आहे.
(३) सदर पुलाच्या दुरुस्तीच्या कामास पूरहानी दुरुस्तीअंतर्गत मंजूरी देण्यात आली असून पुलाचे आर.सी.सी. संकल्पन करुन तद्नंतर अंदाजपत्रक व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम सुरु करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळ (मुंबई) येथील हाजी कासम चाळ व इस्लाम मिल कंपाऊंडच्या पुनर्विकास प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

**(३४) * ३७७२९ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळ (मुंबई) येथील हाजी कासम चाळ व इस्लाम मिल कंपाऊंडच्या ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या पुनर्विकास प्रकल्पात विकासकाने पूर्वी अस्तित्वात नसलेल्या खोल्या / गाळे दाखवून चटईक्षेत्र निर्देशांकाचा लाभ म्हाडा व मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हस्तगत केल्याची तक्रार इमारतीतील रहिवाश्यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासक निश डेव्हलपर्सने अधिकाऱ्यांच्या संगनमताने सदरहू पुनर्विकास प्रकल्पात ५५ भाडेकरु अस्तित्वात नसतांनाही ते दाखवून एफएसआय व प्रोत्साहनात्मक एफएसआय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पातील कंपनीच्या उप कंपनीने सदर प्रकल्पात ४६ बिगर उपकरप्राप्त व्यापारी गाळे खरेदी केले व गाळ्यांच्या बांधकामामध्ये पोटमजले बनावटपणे दाखवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने एफएसआय गैरव्यवहाराप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) मुंबई इमारत व दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अहवालानुसार, परळ (मुंबई) येथील हाजी कासम चाळ व इस्लाम मिल कंपाऊंडच्या ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या पुनर्विकासाबाबत अर्जदार श्री तुलसीदास नायर यांनी दि. २५.१०.२०२१ रोजी शासनास तक्रार दाखल केली आहे.
(२), (३) व (४) म्हाडा प्राधिकरणाच्या अहवालानुसार, अशी बाब निर्दशनास आलेली नाही. तथापि, प्रश्नाधीन बाब शासनस्तरावर तपासण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात ई-कचरा व प्लास्टिक कचरा संकलनात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(३५) * ३८४१९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात सन २०१५ पासून सुरु झालेल्या ई-कचरा व प्लास्टिक कचरा संकलनात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचरा संकलन करणाऱ्या काही ठराविक संस्था आणि महानगरपालिकेचे संबंधित खात्याचे अधिकारी यांच्या संगनमताने गैरप्रकार घडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ई-कचरा व प्लास्टिक कचरा संकलनासाठी नेमलेल्या स्वच्छ संस्था, पूर्णम संस्था, जनवाणी संस्था यांच्या माध्यमातून बोगस कारभार होत असून निविदा प्रक्रियाविना या संस्थाना कामे देण्यात आली असल्याचे महानगरपालिका व एमपीसीबीने माहिती अधिकारात उपलब्ध करून दिलेल्या माहितीमध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) याबाबत स्थानिक वृत्तपत्रात बातमी आली होती, हे खरे आहे.
(२), (३) व (४) या प्रकरणी माहितीचा अधिकार या अधिनियमांतर्गत पुणे महानगरपालिकेस अर्ज प्राप्त झाला होता, हे खरे आहे.

ई-कचरा व प्लॅस्टिक कचरा संकलन व विल्हेवाट याबाबत कामकाज करण्यासाठी फार कमी संस्था पुढाकार घेत असून कमिन्स इंडिया, जनवाणी व इतर संस्था पुणे महानगरपालिकेसमवेत अनेक वर्षांपासून विनामोबदला काम करत आहेत.

ई-कचरा व प्लॅस्टिक कचरा संकलनाकरीता या संस्थांची नियुक्ती पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली नाही. त्यामुळे या संस्थांना निविदा प्रक्रियेविना काम देण्यात आले आहे, हे खरे नाही.

तथापि, स्वच्छ संस्थेची सन २००७ पासून व वेळोवेळी मुदतवाढ देवून घरगुती कचरा संकलनाकरीता मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे होणारा प्रशासकीय खर्च मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांच्या मान्यतेने स्वच्छ या संस्थेस अदा करण्यात येतो.

पुणे शहरात ई-कचरा व प्लॅस्टिक कचरा संकलनात कोणताही गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील माहुल पंपीग स्टेशनसाठी पालिका व विकासक यांच्यातील भूखंड अदलाबदलीत झालेला गैरव्यवहार

**(३६) * ३७६७१ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व):** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यातील माहुल परिसरातील उद्यानाकरीता आरक्षित असलेला व कोणतेही अतिक्रमण नसलेला आणि बांधकाम करण्यायोग्य भूखंड एका विकासकाला देण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकाने त्यांच्याकडील बांधकामास अयोग्य व पर्यावरणविषयक परवानग्याच्या कचाट्यात अडकलेला भूखंड महानगरपालिकेने त्याबदल्यात माहुल पंपीग स्टेशनसाठी आपल्या ताब्यात घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भूखंड अदलाबदल प्रकरणात नियमांची पायमल्ली झाली असून विकासकाचा सुमारे ५०० कोटी रुपयांचा फायदा होऊन, सदर प्रकरणात आर्थिक अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहूल पंपीग स्टेशनकरीता माहूल नाल्यालगत असलेल्या केंद्र सरकारच्या मालकीच्या सॉल्ट पॅन डिव्हीजनमधील सी.एस.क्र. १४४ या भूखंडाची निवड केली होती. सदर भूखंडाचा आगाऊ ताबा मिळण्याकरीता सन २०१५ पासून सॉल्ट कमिशनर, जयपूर यांचेकडे महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येत असून, आजतागायत सदर भूखंडाचा ताबा महापालिकेला मिळालेला नाही.

त्यामुळे, महानगरपालिकेमार्फत नेमलेल्या तांत्रिक सल्लागारांनी पुन्हा सर्वेक्षण व स्थळ निरीक्षण करुन, दोन भूखंड निश्चित केले. त्यापैकी एक भुखंड क्र. २३३बी/१ वर खारफुटी असून तो नैसर्गिक क्षेत्रात वसलेला असल्यामुळे नाल्याला लागून असलेला मौजे आणिक मधील दुसरा भूखंड न.भू.क्र. १अ/११ व १अ/१२ हा माहूल पंपिंग स्टेशन बांधण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे सल्लागारांनी महानगरपालिकेस कळविले. सदर पंपीग स्टेशनकरीता १५००० चौ.मी. जागेची आवश्यकता आहे.

उपरोक्त न.भू.क्र. १अ/११, १अ/१२ हे दोन्ही भूखंड खाजगी मालकीचे आहेत. या भूखंडामधील १३३९० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन, त्याबदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यातील उद्यान म्हणून विकसित झालेला न.भू.क्र. १अ/१४ या भूखंडामधील १३३९० चौ.मी. जागा, विकासकास देण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्ताविले असून सदर भूखंडावरील आरक्षण वगळण्याची/बदलण्याची कार्यवाही सुरु आहे. परंतु, अद्याप पर्यंत सदर भुखंड महानगरपालिकेमार्फत विकासकास हस्तांतरीत करण्यात आलेला नाही.

(२) न.भू.क्र. १अ/११, १अ/१२ या खाजगी मालकीच्या भूखंडावर महानगरपालिका शाळा, प्राथमिक व माध्यमिक शाळा, खेळाचे मैदान व पर्जन्यजल उदंचन केंद्र यांचे आरक्षण असून सदर भूखंड सागरी किनारा नियंत्रण क्षेत्र (सी.आर.झेड.) मध्ये बाधीत आहे. सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण नसून या भूखंडामधील १३३९० चौ.मी. जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर १३३९० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर असलेले, महानगरपालिका शाळा, प्राथमिक व माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान यांचे आरक्षण विकासकाच्या अभिन्यासात स्थलांतरीत करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

तसेच न.भू.क्र. १अ/११, १अ/१२ या भूखंडामधील पर्जन्यजल उदंचन केंद्र (आर.एम.एस. ६.१) करीता १६१६ चौ.मी. क्षेत्र आरक्षित असून ते विकास आराखडा २०३४ च्या वगळलेल्या भागात समाविष्ट आहे. वगळलेल्या भागास शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर, महानगरपालिकेमार्फत जमीन मालकास हस्तांतरणीय विकास हक्क देऊन सदर १६१६ चौ.मी. जमीनीचा ताबा घेण्यात येणार आहे.

यानुसार पंपीग स्टेशन बांधण्याकरीता महानगरपालिकेला अतिक्रमण विरहीत १५००० चौ.मी. जागा उपलब्ध होणार आहे.

(३) महानगरपालिका व विकासक यांच्यामध्ये जागा अदलाबदल करण्याकरीता सामंजस्य करारास (MOU) महानगरपालिका आयुक्तांनी मंजुरी दिली असून सदर प्रस्तावास सुधार समिती व महापालिका यांची मंजुरी घेण्यात आली आहे. महानगरपालिकेमार्फत सदर सामंजस्य करारानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या 'पे ॲण्ड पार्किंग' योजनेतील कंत्राटात झालेला गैरव्यवहार

**(३७) * ३८५०४ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेस 'पे अँड पार्क' च्या माध्यमातून दरवर्षी किमान १०० कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित असताना संबधित ठेकेदार आणि महानगरपालिका अधिकारी यांच्या संगनमतामुळे कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याची बाब दिनांक १६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाने 'पे अॅण्ड पार्किंग' प्रकरणी माहिती घेऊन अहवाल सादर करावा असा आदेश महापौर यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'पे अँड पार्क' गैरव्यवहारात सहभागी असलेल्या ठेकेदार आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजीच्या महानगरपालिकेच्या सभेत बृहन्मुंबई महानगरपालिका विरोधी पक्षनेता यांनी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात "पैसे भरा आणि वाहने उभी करा" तत्वावर देण्यात आलेल्या कंत्राटात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि गैरवापर होत असून महानगरपालिकेचा महसूल बुडत असल्याबाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता.
(२) सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश मा.महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिले आहेत.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्त्यावरील एकूण १०० सशुल्क वाहनतळांपैकी २३ ठिकाणांवरील रस्त्यावरील सशुल्क वाहनतळे सागरी किनारी महामार्ग प्रकल्प, मेट्रो प्रकल्प व वाहतूक पोलीस यांची ना-हरकत या कारणान्वये बंद करण्यात आली आहेत. तसेच महानगरपालिकेच्या दिनांक ०२.०१.२०१५ रोजीच्या ठरावानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणाऱ्या रस्त्यावरील सशुल्क वाहनतळाकरिता ५०% महिला बचत गट, २५% सुशिक्षित बेरोजगार संस्था व २५% खुला प्रवर्ग याकरिता आरक्षित करण्यात आले आहेत. सदर आरक्षणानुसार संबंधित रस्त्यावरील सशुल्क वाहनतळाकरिता निविदा प्रक्रिया पार पाडण्यात येते.

सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील सशुल्क वाहनतळाकरिता ई-निविदामार्फत महत्तम दर सादर करणाऱ्या २३ महिला बचत गट यांची ई-निविदेमार्फत नियुक्ती करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील संबंधित विभागांकडून रस्त्यावरील सशुल्क वाहनतळे महिला बचत गट स्वत: चालवितात किंवा कसे याबाबत खातरजमा करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत आदेश देण्यात आले होते.

त्यानुसार संबंधित विभागांनी याबाबत गैरव्यवहार होत नसल्याबाबतची खातरजमा केली असून, महिला बचत गट यांचेमार्फत चालविण्यात येणारे सशुल्क वाहनतळांची वेळोवेळी पाहणी करण्याचे निर्देश संबंधित विभाग कार्यालयांना देण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग आणि समृद्धी महामार्गाच्या कामामुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३८) * ४०७५९ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग आणि समृद्धी महामार्गाच्या कामासाठी लागणाऱ्या गौण खनिजाच्या वाहतुकीमुळे जिल्हयातील ग्रामीण भागातील जवळपास १२३ किमी लांबीचा रस्ता खराब झाल्याची बाब गतवर्षी करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू क्षतिग्रस्त रस्त्यांचे ३१ जानेवारीपासून जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम आणि पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांसह स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पुन्हा सर्वेक्षण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील क्षतिग्रस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि राज्य रस्ते विकास महामंडळाकडे निधीची वारंवार मागणी करण्यात आल्याने निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे : (**१) होय हे अंशतः खरे आहे.

समृद्धी महामार्गाच्या कामाकरीता गौण खनिज वाहतुकीसाठी गतवर्षी केलेल्या सर्व्हेक्षणानुसार २६.०० कि.मी. लांबीचे रस्ते खराब झालेले होते व ते वेळोवेळी दुरूस्त करण्यात आलेले होते.

(२) होय, हे खरे आहे,

दि.०२.०२.२०२२ रोजी संबंधित यंत्रणा तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पुन्हा सर्वेक्षण करण्यात आलेले आहे, त्याचा संयुक्त सुधारीत अहवाल संलग्न केलेला आहे. त्यानुसार गौण खनिज वाहतुकीसाठी वापरलेले एकुण ३८.४० कि.मी. लांबीचे रस्ते खराब झाले आहेत.

(३) ईपीसी कंत्राटदार यांच्या निविदा अट क्र. १०.४ नुसार त्याने वापरलेले रस्ते स्वखर्चाने दुरुस्ती करणे बंधनकारक असल्यामुळे वेगळ्या निधीची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत गुगामल वन्यजीव विभागात ई-निविदा नसताना कोट्यवधी रुपयाची कामे केल्याबाबत

**(३९) * ३७९११ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत गुगामल वन्यजीव विभागात ई-निविदा न करता कोट्यवधी रुपयांची कामे करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १ कोटी ५० लाख ८३ हजार ९ रुपयांच्या या कामात आवश्यकता असताना ई-निविदा प्रक्रिया राबविली गेली नाही याकडे संचालकांचेही दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामात ई-निविदा न राबविण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीनुसार गैरव्यवहारातील संबंधित दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) गुगामल वन्यजीव विभाग, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती येथे Providing and erecting fixed knot fencing करण्याच्या ३ कामांमध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च रु.१,५०,८३,५५३/- करीता ई-निविदा प्रकिया करण्यात आलेली नाही. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील इतर विभागातील कामांचे मंजूर ई-निविदा दरानुसार आणि अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (रु.२,०९,९९,७००/-) २५.२९% कमी दराने सदर कामे करण्यास मे. अमेय हायड्रो इजिंनियरिंग वर्क्स, नागपूर हे इच्छुक असल्यामुळे तत्कालीन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांनी या कामांकरीता ई-निविदा प्रक्रिया झालेली नसताना कार्यारंभ आदेश पारित केले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) प्रस्तुत प्रकरणी चौकशीअंती तत्कालीन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांना प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेमार्फत कारणे दाखवा नोटिस दिनांक २५.०२.२०२२ रोजी बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) महापालिकेच्या नगररचना विभागातील उपसंचालकांनी नियमबाह्यरित्या टीडीआर वितरित केल्याबाबत

**(४०) * ३८३६४ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे उपसंचालक (श्री.संजय जगताप) हे महापालिकेत पात्रता नसतानाही उपसंचालक पदावर अडीच वर्षे कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २३ डिसेंबर ते ३१ डिसेंबर, २०१९ या नऊ दिवसांच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी ४४,८७,००० चौ.फूट इतक्या क्षेत्रफळाचे बाजारमुल्याप्रमाणे तब्बल ५७७ कोटी रुपयांचे हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) नियमबाह्यरित्या वितरीत केले असल्याच्या तक्रारी तेथील सामाजिक कार्यकर्ते व वसई-विरारच्या जनतेकडून महापालिका प्रशासन व शासनाकडे करण्यात येवून त्यामध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १४ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपसंचालक (श्री.जगताप) नगररचना विभाग यांनी या क्षेत्रफळाचे टीडीआर नियमबाह्यरित्या वाटप केल्याचे व त्यामध्ये तत्कालीन मा.महानगरपालिका आयुक्त यांचाही सहभाग असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) श्री.संजय जगताप हे महाराष्ट्र नगर परिषद राज्यस्तरीय अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा निवड श्रेणीतील कर्मचारी आहेत.

तथापि, श्री.संजय जगताप यांच्याकडे वसई विरार शहर महानगरपालिका अधिनस्त नगर रचना विभागाचा कार्यभार दिनांक ०६.१०.२०१० च्या आदेशान्वये व उपसंचालक पदाचा प्रभारी कार्यभार दिनांक ११.०५.२०१६ रोजीच्या आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या आदेशान्वये देण्यात आला होता, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तसेच श्री. संजय जगताप यांच्या वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी दरम्यान त्यांच्या शैक्षणिक अर्हता, त्यांच्या पदस्थापना, त्यांच्या कार्यकाळातील कामांच्या अनुषंगाने विविध तक्रारी प्राप्त झाल्या असून वेळोवेळी शासन स्तरावरुन आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिकेस कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

दरम्यान सदर प्रकरणी उपसंचालक दर्जाचा निवृत्त अधिकारी चौकशी अधिकारी म्हणून देणेबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत संचालक, नगररचना व मुल्यांकन विभाग यांना पत्रव्यवहार केल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, सदर प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेता आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना त्यांच्या स्तरावरुन सखोल चौकशी करुन ८ आठवड्याच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील वन विकास महामंडळ कार्यालयातील तत्कालीन विभागीय व्यवस्थापक यांनी केलेला गैरव्यवहार

**(४१) * ३७७८६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील वन विकास महामंडळ कार्यालयातील तत्कालीन विभागीय व्यवस्थापक यांनी सुमारे १ कोटी ६४ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने अटक केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन विभागीय व्यवस्थापक व त्यांचे सहकारी यांनी वनोपज निष्कासनाच्या कामाकरीता बोगस मजूर दाखवून तीन वर्ष शासनाचे आर्थिक नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन विभागीय व्यवस्थापक व त्यांच्या सहकाऱ्यांनी अधिक वनोपज निष्कासन दाखवून प्रत्यक्षात विक्री करता कमी वनोपज पाठवून शासनाची करोडो रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने तत्कालीन विभागीय व्यवस्थापक व संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच त्यांच्यावर कोणता गुन्हा दाखल केला वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित या कार्यालयाच्या अंतर्गत चंद्रपूर प्रदेशाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या मध्य चांदा वन प्रकल्प विभागासंबंधी आर्थिक वर्ष २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या तीन वर्षात कुपातून वनोपज निष्कासनाचे कामासंबंधी अनियमितता झाली असल्याचे वर्ष २०१७ मध्ये निदर्शनास आले होते. सदर प्रकरणी वन विकास महामंडळाला रु.१,९९,४७,८८६,/- इतके आर्थिक नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या रक्कमेमध्ये तत्कालिन सहाय्यक व्यवस्थापक व नंतर विभागीय व्यवस्थापक म्हणून श्री.पी.एन.वाघ (सेवानिवृत्त विभागीय व्यवस्थापक) यांचे कालावधीतील म्हणजे सन २०१५-१६ व २०१६-१७ मधील नुकसानीची रक्कम रु.१,६३,९५,७६६/- इतकी आहे. सदर प्रकरणी श्री.पी.एन.वाघ यांना दि.०४.०१.२०२२ रोजी पोलीसांद्वारे अटक करण्यात आली.
(४) उक्त प्रकरणी केलेल्या चौकशीच्या आधारे संबंधित विभागीय व्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक असे एकूण २१ अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून वसूलपात्र रक्कम रु.१,९९,४७,८८६/- बाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. तसेच एकूण १९ अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात आली. याशिवाय याच प्रकरणात वित्तीय अनियमिततेसंबंधी जबाबदार असलेले तत्कालिन विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, मध्य चांदा श्री.पी.एन.वाघ (सेवानिवृत्त) यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४०९, ४६६, ४७१ व ३४ नुसार दि.१७.१०.२०२१ रोजी पोलीस निरीक्षक, बल्लारशाह पोलीस ठाणे या ठिकाणी एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेला असून सदर पोलिसांमार्फत पुढील तपासकार्य सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकांच्या टॅब खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४२) * ३७६७२ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा):** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या शाळांमधील मराठी, हिंदी, इंग्रजी आणि ऊर्दू माध्यमातील दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी टॅब खरेदी केले जाणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या टॅबच्या स्क्रीनचा आकार, बॅटरी लाईफ, रॅम, मेमरी, इंटरनेट सुविधा, सॉफ्टवेअर आवृत्ती, लर्निंग सॉफ्टवेअर, टॅबचा दर्जा त्याची तांत्रिक वैशिष्ट्ये तसेच संबंधित कंपनीच्या माहितीचा तपशील याबाबत काहीही स्पष्टता त्याबाबतच्या प्रस्तावात नाही अथवा जाहीर करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना हे टॅब दोन महिन्यांनंतर मिळणार असून मार्चमध्ये बोर्डाच्या परीक्षा होईपर्यंत ते वापरण्यासाठी जेमतेम एक महिना उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पूर्वीच्या टॅब खरेदीच्या तुलनेत अधिक पैसे खर्च करुन यावर्षी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्षाच्या शेवटी कमी कालावधीसाठी टॅब खरेदी करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, टॅबची वाढीव किंमत, तांत्रिक तपशील तसेच शैक्षणिक वर्षाचा उर्वरित कमी कालावधी पाहता या निर्णयाचा पुनर्विचार करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) यानुषंगाने ई-निविदा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आली होती. सदर निविदेच्या मसुद्यामध्ये, स्क्रीनचा आकार, बॅटरी लाईफ, रॅम, मेमरी, इंटरनेट सुविधा, सॉफ्टवेअर आवृत्ती, लर्निंग सॉफ्टवेअर, टॅबचा दर्जा, त्याची तांत्रिक वैशिष्ट्ये इत्यादी बाबी नमूद करण्यात आल्या होत्या.
(३) सन २०२१-२२ च्या विद्यार्थ्यांकरीता सदर टॅब दोन ते तीन महिने वापरण्यास उपलब्ध होतील. मात्र पुढील वर्षापासून इयत्ता १० वी च्या पाच बॅचच्या विद्यार्थ्यांना नियमितपणे वापरण्यास मिळतील.
सद्यस्थितीत यापूर्वी खरेदी करण्यात आलेले टॅब विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्ये उपलब्ध आहेत.

(४) व (५) यापूर्वी खरेदी करण्यात आलेले टॅब हे एक वर्ष अधिक दोन वर्षाच्या वॉरंटीसह होते. सद्यस्थितीत खरेदी करण्यात येणारे टॅब हे पाच वर्षाच्या वॉरंटीसह असून अद्ययावत व आधुनिक वैशिष्ट्ये तसेच अभ्यासक्रम अंतर्भूत असलेले आहेत. या टॅबमध्ये इंटरनेट/वाय-फायची सुविधा असून चांगल्या कंपनीचे सॉफ्टवेअर व अद्ययावत कंटेंटसह उच्चतम क्षमतेची बॅटरी इत्यादीचा समावेश आहे. या टॅबमध्ये लर्निग मॅनेजमेंट सिस्टीम (एल.एम.एस.) घेण्यात आल्यामुळे विद्यार्थ्याने टॅबचा किती वापर केला हे शिक्षकांना कळणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीत खरेदी करण्यात येणाऱ्या टॅबची किंमत वाढली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महापालिकेअंतर्गत महिला प्रशिक्षण संस्था निवडीप्रकरणी झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार

**(४३) * ३८३६५ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महापालिकेच्या नगरवस्ती विभागामार्फत शहरातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात असून त्यासाठी नागरी वस्ती विभागाकडे ११ कोटी रुपये शिल्लक असल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी संस्थांची निवड करण्यासाठी निविदा पध्दत राबविणे बंधनकारक असतांना, त्याऐवजी महिला बालकल्याण विभागाने प्रथम थेट पध्दतीने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थांची निवड करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिला बालकल्याण विभागाने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची केलेली निवड स्थायी समितीने रद्द करुन त्याऐवजी “चार्म्स” या संस्थेला सदरचे काम देण्याचा प्रस्ताव मंजूर करुन सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका प्रशासनास आदेश देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संस्थांच्या निवड पध्दतीबाबत लोकप्रतिनिधी व जनतेकडून विरोध करण्यात येवून सदर प्रस्ताव रद्द करण्याबाबतची मागणी करण्यात आल्याचेही दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड शहरातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रकारचे व्यवसायिक प्रशिक्षण देण्यात येते. याकरीता अंदाजपत्रकात सन २०२१-२०२२ या वर्षासाठी रू.३५ कोटी एवढी तरतूद करण्यात आली होती. त्यातील दि.२३.०८.२०२१ रोजी रू.३०,७५,६२,१८०/- एवढी रक्कम शिल्लक आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था या संस्थेची नियुक्ती करण्यास स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी ठराव क्र.६६५२, दि.०५.०२.२०२० अन्वये सन २०१९-२० साठी मान्यता देण्यात आली होती.

तथापि, स्थायी समिती, ठराव क्र.६७१५, दि.१७.०२.२०२० अन्वये दि.३१.०३.२०२० अखेरपर्यंतच्या कालावधीतील व सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील दि.३१.०३.२०२१ अखेर पर्यंतच्या कालावधीसाठी प्रशिक्षणाचे काम करण्यास मे.चॅम्स एज्युटेक प्रा.लि. चिंचवड, पुणे या संस्थेला मान्यता देण्यात आली होती.

तद्नंतर स्थायी समितीने पुन्हा ठराव क्र.६९८१, दि.११.०३.२०२० अन्वये यापूर्वी केलेला स्थायी समिती ठराव क्र.६७१५, दि.१७.०२.२०२० रद्द करण्यास मान्यता दिली. त्यानंतर सदर प्रशिक्षणाच्या कामासाठी मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेशी नियुक्ती करण्यास स्थायी समिती ठराव क्र.६९८२, दि.११.०३.२०२० अन्वये मान्यता देण्यात आली.

या प्रकरणी सक्षम समितीने ठरावात वारंवार बदल केल्यामुळे सन २०१९-२० या आर्थिक वर्षात प्रशिक्षणाचे कामकाज कोणत्याही संस्थेला देणे शक्य झाले नाही.

(४) याबाबत वेळोवेळी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस पत्रव्यवहार झालेला आहे, हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.